महाराष्ट्र विधानपरिषद

चौथे अधिवेशन, २०१७

तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

शुक्रवार, दिनांक १५ डिसेंबर, २०१७ / अग्रहायण २४, १९३९ (शके)

(१) आदिवासी विकास मंत्री
(२) उद्योग, खनिकर्म मंत्री
(३) ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा, राज्य उत्पादन शुल्क मंत्री
(४) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री
(५) सहकार, पणन व वस्त्रोद्योग मंत्री

} **यांचे प्रभारी विभाग**

प्रश्नांची एकूण संख्या - ९०

नाशिक येथील वीज वाहिन्या भुमिगत करण्याबाबत

(१) * ३५२०९ डॉ.अपूर्व हिरे : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील सिडको भागातील इंदिरानगर येथे विजेच्या खांबावर काम करीत असतांना समन्वयाअभावी अचानक विद्युत पुरवठा सुरु झाल्याने विजेचा धक्का लागून समीर वाघ या कर्मचाऱ्याचा मृत्यू झाल्याचे दिनांक १७ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सिडको भागात घरालगतच्या खांबावरील वीज तारांमुळे गच्चीत केबलचे काम करणाऱ्या तीन व्यक्तिंना उघडया वीज वाहिनीचा धक्का लागून तिघेही गंभीर जखमी झाल्याचे दिनांक २८ ऑगस्ट, २०१७ रोजी वा

त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सिडकोतील अंतर्गत व बहिर्गत रस्त्यांवरील घरे व दुकानांच्या गच्ची आणि खांबावरील वीज वाहिन्यांमध्ये अनेक ठिकाणी दोन ते चार फुटाचेही अंतर नसल्यानेच सदर अपघात घडले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सिडको भागातील घरांना खेटून असलेल्या सुमारे साठ टक्के भागातील उघड्या व इतर सर्व वीज वाहिन्या भुमिगत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, सदर काम केव्हापर्यंत पुर्ण होणे अपेक्षित आहे व यासाठी होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे खरे आहे, सदरहू अपघात सिडको भागात झालेला नसून इंदिरानगर, नाशिक येथे झाला आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सिडको परिसरांत विद्युत वाहिन्या पूर्वी सुरक्षित अंतरावर होत्या. परंतु काही रहिवाशांनी विना परवाना तसेच सुरक्षिततेची काळजी न घेता घरांची बांधकामे विद्युत वाहिन्यांजवळ केल्याने काही ठिकाणी धोकादायक परिस्थिती निर्माण होवून अपघात घडले आहेत.
(४) नवीन नाशिक (सिडको, नाशिक) मधील विद्युत वाहिन्या भूमिगत करण्यासाठी पायाभूत आराखडा योजना-२ अंतर्गत १९.६०४ कि.मी. उच्चदाब वाहिनी, १२.५८२ लघुदाब वाहिनी, २३० उच्चदाब व लघुदाब फिडर पीलरची कामे करण्यात आलेली आहेत. तसेच विद्युत वाहिन्या भूमिगत करण्यासाठी एकात्मिक ऊर्जा विकास योजना अंतर्गत ८.८६ कि.मी. उच्चदाब वाहिनी, २९.५० कि.मी. लघुदाब वाहिनी व ११० नग लघुदाब फिडर पिलरची कामे प्रस्तावित आहेत.

जिल्हा नियोजन समिती योजनेंतर्गत सन २०१७-१८ मध्ये उच्चदाब व लघुदाब वाहिनी भूमिगत करण्यासाठी नवीन सिडको भागात रुपये २५.७२ लक्ष निधी मंजूर झालेला असून निविदा प्रक्रिया सुरु आहे.
(५) (I.P.D.S) योजनेत मंजूर असलेली कामे पूर्ण करण्याची अंतिम तारीख २७/०८/२०१८ आहे व जिल्हा नियोजन समिती योजनेंतर्गत कामे सन २०१७-१८ अखेर पूर्ण करण्यात येतील.

नागपूर, वर्धा व बुलढाणा जिल्ह्यातील को-ऑपरेटिव्ह बँकेतील खातेदारांना ठेवींची रक्कम परत करण्याबाबत

(२) * ३५२२३ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर, वर्धा व बुलढाणा या तीन जिल्ह्यातील को-ऑपरेटिव्ह बँकेत नागरिकांनी भविष्यातील मुलांच्या शिक्षणासाठी व लग्नकार्यासाठी मुदत ठेवींची (एफ.डी.) रक्कम जमा केली आहे व ज्यांच्या मुदत ठेवींची (एफ.डी.) मुदत संपली आहे त्यांना गत वर्षापासून नियमानुसार रक्कम न देता केवळ ५ टक्केच रक्कम दिली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा पध्दतीने पैसे परत केल्यास नागरिकांना आपली पूर्ण रक्कम मिळण्यास १० ते १५ वर्षाचा कालावधी लागणार असल्यामुळे खातेदारांमध्ये भितीचे व चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी दिनांक ८ ऑक्टोबर, २०१७ रोजी शासनास पत्र पाठवून खातेदारांना त्यांची रक्कम परत करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) अभिलेख पडताळणी केली असता नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी दिनांक ८ ऑक्टोबर, २०१७ रोजी शासनास निवेदन दिल्याचे आढळून आले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई जेट एअरवेज को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि. मधील गैरव्यवहाराबाबत

(३) * ३५७७६ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई जेट एअरवेज को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि. मधील गैरव्यवहार व ग्राहक कर्जाची चौकशी करण्यासाठी उपनिबंधक सहकारी संस्था के-पूर्व विभाग, मुंबई यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८३ अन्वये दिनांक ०७ जून, २०१७ रोजी चौकशी अधिकाऱ्यांची नेमणूक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोकप्रतिनिधींनी सहकारी अधिनियम कलम ८८ अन्वये मा.मंत्री सहकार यांना चौकशी करण्याकरीता पत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त संस्थेचा गैरव्यवहार व ग्राहक कर्जाबाबत झालेल्या चौकशीचा अहवाल प्राप्त झाला आहे काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) उपनिबंधक, सहकारी संस्था, के-पूर्व विभाग यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८३ अन्वये चौकशी करण्यासाठी श्री.शिवाजी शिंदे, सनदी लेखापरिक्षक यांची प्राधिकृत चौकशी अधिकारी म्हणून दिनांक ०७ जून, २०१७ रोजीच्या आदेशान्वये नेमणूक केली असून सदर आदेशामध्ये नमूद केलेल्या मुद्द्यांच्या अनुषंगाने चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत

(४) * ३४९५४ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.जनार्दन चांदूरकर, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अनिल भोसले, श्री.प्रकाश गजभिये, डॉ.अपूर्व हिरे, श्रीमती स्मिता वाघ : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मराठा समाजाला शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या प्रवर्गांतर्गत १६ टक्के आरक्षण देण्याबाबतचा प्रश्न सन-२०१४ पासून प्रलंबित असून सदर समाजाला आरक्षण मिळण्यासाठी राज्यात शांततेच्या मार्गाने आंदोलने व मोर्चे काढून शेवटी दिनांक ९ ऑगस्ट, २०१७ रोजी मुंबईत आझाद मैदान येथे महामोर्चा काढण्यात आलेला असणे, यासंदर्भातील मुद्दा राज्य मागास आयोगापुढे प्रलंबित असणे तसेच या आयोगाचे अध्यक्ष माजी न्यायमुर्ती संभाजी म्हसे यांच्या निधनामुळे रिक्त जागी नवीन अध्यक्षांची नियुक्ती करावी लागणार असल्याने मराठा आरक्षण लांबणीवर पडणार असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मोर्चेकऱ्यांच्या शिष्टमंडळासमवेत चर्चा करुन मराठा आरक्षणासंदर्भात राज्य मागासवर्ग आयोगाने विशिष्ट कालावधीत अहवाल सादर करणे, शैक्षणिक शिष्यवृत्तीसाठी असलेली गुणमर्यादा शिथिल करणे, वाढीव अभ्यासक्रमानुसार शिष्यवृती देणे, मराठा समाजातील मुला-मुलींसाठी प्रत्येक जिल्ह्यात वसतिगृह बांधण्यासाठी रुपये ५ कोटीचे अनुदान देणे व अण्णासाहेब पाटील महामंडळास विशेष अनुदान देऊन मराठा तरुणांना रुपये १० लाख कर्ज देणे या प्रमुख व इतर बाबींसंदर्भात मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक ९ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास सभागृहात निवेदन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच मराठा समाजाच्या आरक्षणासाठी मा.महसूल मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या दिनांक ५ ऑक्टोबर, २०१७ रोजीच्या बैठकीत कोणता निर्णय घेण्यात आला व त्यानुषंगाने अंमलबजावणीची सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजकुमार बडोले : (१) सद्य:स्थितीत सदर बाब ही न्यायप्रविष्ट आहे. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक ४ मे, २०१७ रोजीच्या आदेशामध्ये मराठा आरक्षणाबाबत संग्रहीत माहिती राज्य मागासवर्ग आयोगाकडे पाठविण्याबाबत राज्य शासनाने स्वतःच्या अधिकार क्षेत्रात निर्णय घ्यावा, असे स्पष्ट केले होते. त्याप्रमाणे मराठा समाजाचे सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक मागासलेपणाबाबत सर्व दस्तऐवज तपासून स्वयंस्पष्ट अहवाल शासनास तात्काळ सादर करण्याबाबत शासन पत्र दिनांक ३०/०६/२०१७ अन्वये राज्य मागासवर्ग आयोगास कळविण्यात आले आहे.

राज्य मागासवर्ग आयोगावर अध्यक्ष म्हणून कार्यरत सेवानिवृत्त न्या.श्री.संभाजीराव बाबुराव म्हसे यांचे निधन झाल्यामुळे त्यांच्या उर्वरित कालावधीकरिता रिक्त असलेल्या अध्यक्षपदी सेवानिवृत्त न्यायमुर्ती, श्री.मारोती गणपती गायकवाड यांची शासन अधिसूचना दिनांक ०२ नोव्हेंबर, २०१७ अन्वये नियुक्ती करण्यात आली आहे.
(२) हे खरे आहे.
(३) मराठा समाजाचे सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक मागासलेपण स्पष्ट करणारे ऐतिहासिक पुरावे, संदर्भ इत्यादी सर्व दस्तऐवज तपासून स्वयंस्पष्ट अहवाल शासनास तात्काळ सादर करण्याबाबत शासन पत्र दिनांक ३०/०६/२०१७ अन्वये राज्य मागासवर्ग आयोगास कळविण्यात आले आहे.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळण्यासाठी ६० टक्के गुणांची अट शासन निर्णय दिनांक ११/०८/२०१७ अन्वये शिथिल करून या शिष्यवृत्ती योजनेंतर्गत वाढीव नवीन अभ्यासक्रमांचा समावेश

शासन निर्णय दिनांक ०७/१०/२०१७ अन्वये करण्यात आला आहे. तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्यात वसतिगृह बांधण्यासंदर्भातील प्रस्ताव विचाराधीन असल्याने वसतिगृह निर्वाह भत्ता योजना सुरु करण्याचे प्रस्तावित आहे.

आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत तरुणांना कर्ज उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने तीन नवीन योजना राबविण्यास शासन निर्णय दिनांक २१/११/२०१७ अन्वये मान्यता दिलेली आहे.

मराठा, कुणबी व शेती व्यवसायातील बहुजन समाज यांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विकासाकरिता छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (SARTHI) स्थापण्याच्या पूर्व तयारीसाठी दिनांक ०३/०१/२०१७ च्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करून समितीच्या विस्तृत कार्यव्याप्तीमुळे सदर समितीस शासन निर्णय दिनांक १३/११/२०१७ अन्वये दिनांक ३१/१२/२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

मराठा मोर्चाच्या अनुषंगाने विधीमंडळात मा.मुख्यमंत्री महोदय यांनी घोषित केलेल्या विविध निर्णयावरील कार्यवाहीचा आढावा घेण्यासाठी मा.मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय दिनांक ४ ऑक्टोबर, २०१७ अन्वये मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर उपसमितीच्या दिनांक ०५/१०/२०१७ रोजीच्या पहिल्या बैठकीत मंत्रिमंडळ उपसमिती सदस्यांकडे विषयानुरूप जबाबदारीचे वाटप करण्यात आलेले आहे. सदर उपसमितीच्या दिनांक २८/११/२०१७ पर्यंत पार पडलेल्या एकूण ८ आढावा बैठकांमध्ये घेतलेल्या निर्णयांची संबंधित विभागामार्फत अंमलबजावणी चालू आहे.

महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २०१२ मध्ये वडिलांकडील रक्तनाते संबंधात जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र देण्याबाबत शासन अधिसूचना दिनांक २४/११/२०१७ अन्वये सुधारणा करण्यात आली आहे. तसेच अधिक सुलभीकरणासाठी प्रारूप अधिसूचना व परिपत्रक तपासून देण्यासाठी विधी व न्याय विभागास पाठविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद शहरातील आदिवासी विभागाच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या गैरसोयींबाबत

(५) * ३५४०० श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील आदिवासी विभागाच्या ४ वसतिगृहांतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०१७-१८ या वर्षासाठीचे साहित्य, शालेय पुस्तके, स्पर्धा परिक्षेची पुस्तके तसेच सन २०१६-१७ या वर्षासाठीच्या शिष्यवृत्तीची रुपये १० कोटी इतकी रक्कम मिळाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिष्यवृत्तीचे अर्ज भरण्यासाठीची वेबसाईट बंद असणे व मेस ठेकेदारांकडून विद्यार्थ्यांना नियमित आहार पुरवठा होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार विद्यार्थ्यांना नियमित शिष्यवृत्त्ती, शैक्षणिक साहित्य व इतर सोई सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.विष्णु सवरा : (१) अंशत: खरे आहे.

वसतिगृहातील विद्यार्थ्यांना सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षासाठी नियमानुसार देय असलेल्या सर्व सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. तथापि, ४४३८ विद्यार्थ्यांना सन २०१६-१७ या वर्षाची शिष्यवृत्ती वाटप करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(२) व (३) ई-विकास संगणक प्रणालीवर सन २०१६-१७ या वर्षाचे शिष्यवृत्ती अर्ज भरण्यासाठी जुलै, २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानंतर आता सन २०१६-१७ या वर्षासाठीचे नवीन अर्ज स्वीकारणे बंद करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत प्राप्त अर्जांची तपासणी करून सन २०१६-१७ या

वर्षामधील शिष्यवृत्ती वाटपाची कार्यवाही सुरू आहे.

वसतिगृहात प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांना भोजनठेकेदाराकडून नियमित आहार दिला जात असून याबाबत विद्यार्थ्यांची कोणतीही तक्रार नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यातील विशेषत: बीड जिल्ह्यात कृषी पंप वीज जोडण्या प्रलंबित असल्याबाबत

(६) * ३४९०९ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३१९७० ला दिनांक २७ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भ, मराठवाड्यातील विशेषत: बीड जिल्ह्यात महावितरणाकडे कृषी पंपासाठी अनेक प्रकरणे प्रलंबित असणे तसेच पश्चिम महाराष्ट्रात ५० हजार शेतकरी कृषीपंप वीज जोडण्या प्रलंबित असल्याने दिनांक १० ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास शेतकऱ्यांसाठी कृषीपंप जोडणीची विशेष योजना राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीड जिल्ह्यात कृषी पंपाच्या विद्युतीकरणाचा अनुशेष निर्माण झाल्याने नवीन पध्दती सुधारणांची कामे प्रलंबित असून जिल्ह्यात सुमारे चाळीस वर्षापुर्वी करण्यात आलेल्या वीज जोडण्या जीर्ण होऊन विद्युत अपघात होण्याचे प्रमाण वाढले असल्याने लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान महावितरणाच्या कामकाजात सुधारणा करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विदर्भात शेतकऱ्यांनी सन २०१५-१६ मध्ये प्रत्यक्षात मागणी केलेली व महावितरणाने जोडण्या दिलेल्या आकडेवारीमध्ये तफावत असल्याचे निदर्शनास आले असल्याने सदर कालावधीत कृषीपंप जोडणीकरीता उपलब्ध करण्यात आलेली व प्रत्यक्षात खर्च करण्यात आलेली आकडेवारी किती आहे,

(४) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत तसेच बीड जिल्ह्यात अनेक कामाचे कार्यारंभ आदेश निर्गमित होऊनही कामे विहित मुदतीत पूर्ण न करणाऱ्या ठेकेदारांविरुध्द कारवाई करुन बीड जिल्ह्यातील भारनियमन कमी

करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) विदर्भ व मराठवाडयामध्ये ऑक्टोबर, २०१७ अखेर १०७३५४ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित असून त्यापैकी बीड जिल्हयामध्ये ६८८२ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित आहेत. तसेच पश्चिम महाराष्ट्रात ऑक्टोबर, २०१७ अखेर ५८९१२ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित आहेत. विदर्भ व मराठवाड्यातील प्रलंबित कृषीपंप वीज जोडणीकरिता विशेष योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(२) होय हे खरे आहे. बीड जिल्हयामध्ये बीड, गेवराई व आष्टी तालुक्यात एकूण २१.३८ कि.मी. जीर्ण झालेल्या लघुदाब वाहिनीच्या तारा व २८ जीर्ण झालेले पोल बदलण्यात आले आहेत. तसेच अंबाजोगाई विभागांतर्गत परळी व केज तालुक्यात एकूण १३ कि. मी. जीर्ण झालेल्या लघुदाब / उच्चदाब वाहिनीच्या तारा व ३८ जीर्ण झालेले पोल बदलण्यात आले आहेत.

(३) विदर्भात मार्च, २०१५ अखेर ६५७७२ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित होते. त्यापैकी सन २०१५-१६ मध्ये विदर्भाकरिता अनुशेष योजनेंतर्गत रुपये १५८.४० कोटी, विशेष पॅकेज योजनेंतर्गत रुपये ४५९ कोटी असा एकूण रुपये ६१७.४० कोटी इतका निधी मंजूर होता. त्यापैकी अनुशेष योजनेंतर्गत रुपये १५८.४० कोटी, विशेष पॅकेज १ योजनेंतर्गत रुपये ४५२.१४ कोटी असा एकूण रुपये ६१०.५४ कोटी इतका निधी खर्च करण्यात आला आहे.

(४) सन २०१७ च्या जून/जुलै महिन्यात सतत पावसामुळे व तद्नंतर शेतात उभी पीके असल्यामुळे कृषीपंपाना वीज जोडणी देण्याकरीता लघुदाब वाहिनी उभारणीसाठी अनेक अडचणी निर्माण झाल्या होत्या. त्यामुळे या कालावधीमध्ये कमी प्रमाणात वीज जोडणी देण्यात आली.

दिनांक ०८/०९/२०१७ ते ०७/१०/२०१७ दरम्यान काही तांत्रिक अडचणीमुळे भार नियमन झाले होते. सद्य:स्थितीत भार नियमन करण्यात येत नाही. तथापि, कृषी ग्राहकांसाठी सद्य:स्थितीत चक्राकार पध्दतीने दिवसा ८ तास व रात्री ८ तास थ्रीफेज वीज पुरवठा करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक येथील कृषी टर्मिनल मार्केट विकसित करण्याबाबत

(७) * ३४८३८ श्री.जयवंतराव जाधव, डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ३२०२२ ला दिनांक १० ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पिंपरी सय्यद (जि.नाशिक) येथे नाशिक टर्मिनल मार्केटसाठी निश्चित केलेल्या जागेची पाहणी करुन सहसंचालक (पणन) यांचे अध्यक्षतेखालील समितीने दिनांक ६ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनास अहवाल सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अहवालात टर्मिनल मार्केट विकसित करण्याच्यादृष्टीने खाजगी भागीदारीकरिता बिजनेस मॉडेल तयार करून शासनास सादर करण्याच्या सूचना महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळास देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पणन महामंडळाचा यासंबंधीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) मौजे पिंपरी सय्यद (जि.नाशिक) येथे नाशिक टर्मिनल मार्केट उभारण्यासाठी निश्चित केलेल्या जागेची दिनांक १७/१२/२०१६ व दिनांक ०६/०१/२०१७ रोजी सहसंचालक (पणन) यांचे अध्यक्षतेखालील समितीने प्रत्यक्ष पाहणी केली व त्याबाबतचा अहवाल दिनांक २८/०२/२०१७ च्या पत्रान्वये पणन संचालनालयाने शासनास सादर केला आहे.

(२) खाजगी भागीदारीतून टर्मिनल मार्केट उभारण्याचे प्रस्तावित असल्यामुळे Business Model तयार करुन शासनास सादर करण्याच्या सूचना दिनांक १७/०७/२०१७ च्या शासन पत्रान्वये पणन मंडळास देण्यात आल्या होत्या.

(३) पणन मंडळाचा यासंबंधीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून सदर अहवालावर शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील दिव्यांगांच्या शाळांमधील रिक्त पदे भरण्याबाबत

(८) * ३५८७० डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, आर्कि.अनंत गाडगीळ : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठीच्या शाळांमधील पद भरती मागील अनेक वर्षांपासून बंद असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व शारिरीक स्वास्थ्यावर परिणाम होत असल्याने आकृतिबंधानुसार सदरील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजकुमार बडोले : (१), (२) व (३) मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाने अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळांमधील रिक्त पदे भरण्यापूर्वी अपंग कल्याण आयुक्तालय स्तरावर ठेवलेल्या प्रतिक्षा यादीवरील उमेद्वार उपलब्ध करुन देण्याचे निर्देश दिले असून त्यानुसार कार्यवाही करण्यात येते.

तसेच, वेतनावरील खर्च नियंत्रित करण्यासंदर्भात वित्त विभागाकडून निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयान्वये पदभरतीसंदर्भात निर्देश देण्यात आले आहेत. सदर निर्देशातून दिव्यांगांच्या विविध शाळा कार्यशाळा, वसतिगृहे आणि बालगृहांमधील पद भरतीस सुट देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

धनगर समाजास आरक्षण देण्याबाबत

(९) * ३५४८० श्री.धनंजय मुंडे, श्री.संजय दत्त, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक ३१३४२ ला दिनांक २७ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धनगर समाजाच्या आरक्षणासंदर्भात टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्सेस मुंबई यांचेकडून धनगर समाजाच्या सामाजिक व मानव वंशशास्त्रीय दृष्टीकोनातून भाग-१ व भाग-२ अंतर्गत अभ्यास करण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी ओरॉन, धनगड या अनुसूचित जमाती आणि धनगर ही भटकी जमात यासंदर्भात अहवाल सादर केला आहे काय, हे ही खरे आहे.

(३) असल्यास, राज्यातील धनगर समाजाच्याबाबतीत या संस्थांना शासनास अहवाल सादर करण्यासाठी किती कालावधी लागणार आहे तसेच धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या सवलती देणेबाबत शासन किती कालावधीत निर्णय घेणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.विष्णु सवरा : (१), (२) व (३) नाही. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस मुंबई यांचेकडून मानववंशशास्त्रीय दृष्टीकोनातून भाग-१ व भाग-२ अंतर्गत अभ्यास करण्यात येत असून त्यानुसार अहवाल तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडून दिनांक २/११/२०१५ रोजीच्या पत्रान्वये शासनास प्राप्त झालेला वस्तुस्थितीदर्शक अभिप्रायात्मक अहवाल प्राप्त झाला आहे. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई यांचेकडून अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही अपेक्षित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुळा-प्रवरा वीज सहकारी संस्थेने (ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर) दुष्काळग्रस्तांसाठीच्या रक्कमेचा गैरवापर केल्याबाबत

(१०) * ३४७५० डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुळा-प्रवरा वीज सहकारी संस्थेने (ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर) दुष्काळग्रस्तांच्या रुपये १७ कोटी अनुदानाचा गैरवापर केल्याचा आक्षेप लेखा परिक्षकांनी घेतल्यामुळे प्रवरा शिक्षण संस्थेचे माजी कार्याध्यक्ष यांनी याबाबत श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस निरीक्षकांनी सदर तक्रार नोंदवून न घेता चौकशीसाठी सदर तक्रार सहकार खात्याकडे पाठविली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी सहकार खात्याने चौकशी पूर्ण केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) मुळा-प्रवरा वीज सहकारी संस्था, ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर या संस्थेच्या सन २०१५-१६ या वर्षाच्या लेखा परीक्षण अहवालात शासनाने दुष्काळग्रस्तांच्या वीज दरातील सवलतीसाठी दिलेल्या निधीबाबत दिलेल्या शेऱ्याबाबत, महाराष्ट्र सहकारी संस्था १९६० च्या तरतुदीनुसार चौकशी करण्याची विनंती श्री.अशोक विखे-पाटील यांनी दिनांक ३/१०/२०१७ रोजीच्या अर्जाद्वारे श्रीरामपूर पोलीस ठाणे, ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर यांच्याकडे केली आहे.

(२) सदर अर्जातील बाब सहकार खात्याच्या अखत्यारित येत असल्याने सदरचा अर्ज चौकशीकामी उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांच्याकडे पाठविण्यात आला आहे.

(३) सहाय्यक निबंधक, श्रीरामपूर यांच्याकडून चौकशी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील जात पडताळणीच्या कामांसाठी अध्यक्षांच्या नियुक्त्या करण्याबाबत

(११) * ३४८६० श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.गोपिकिशन बाजोरीया, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, आर्कि.अनंत गाडगीळ, श्रीमती स्मिता वाघ, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.रामराव वडकुते, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ३६ जिल्ह्यांमधील जात पडताळणीच्या कामांसाठी केवळ चार अध्यक्ष कार्यरत असून १८ जात पडताळणी समित्यांना अध्यक्ष नसणे व १२ समित्यांवर सदस्य सचिव कार्यरत असल्यामुळे सुमारे तीन लाखाहून अधिक जात पडताळणीची प्रकरणे प्रलंबित असून हजारो विद्यार्थी, कर्मचारी, अधिकारी तसेच स्थानिक स्वराज्य संस्था आणि शासकीय नोकरीत रुजू होणाऱ्या उमेदवारांची गैरसोय होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अकोला जात पडताळणी विभागातील समिती अध्यक्ष, श्री.तिटकरे यांच्यावर नऊ तसेच समिती सदस्य श्री.कदम, उपायुक्त यांचेकडे वाशिमसह पाच जिल्हयांची जबाबदारी असल्यामुळे शेकडो विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यास विलंब लागत असल्याचे माहे ऑक्टोंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रलंबित जात वैधता प्रमाणपत्रे त्वरीत मिळण्यासाठी समित्यांवरील रिक्त पदांवर अध्यक्षांची नियुक्ती करणे व इतर गैरसोई दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजकुमार बडोले : (१) नाही.

राज्यातील ३६ जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांपैकी १९ समित्यांच्या अध्यक्ष पदावर, ३० समित्यांच्या उपायुक्त तथा सदस्य पदावर, १५ समित्यांच्या संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव पदावर नियमित अधिकारी कार्यरत आहेत. रिक्त असलेल्या पदांचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आला असून समित्यांचे कामकाज सुरळीत सुरू आहे.

(२) नाही.

श्री.आय.एम.तिटकारे यांच्याकडे जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, अकोला येथील अध्यक्ष पदाचा नियमित कार्यभार असून यवतमाळ व बुलढाणा या २ समित्यांच्या अध्यक्ष पदाचा अतिरिक्त कार्यभार आहे.

तसेच, श्री.एस.आर.कदम यांच्याकडे उपायुक्त तथा सदस्य जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, अकोला या एकाच पदाचा नियमित कार्यभार आहे.

(३) अध्यक्षांच्या पदावर पदोन्नतीने अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याची कार्यवाही महसूल व वन विभागामार्फत करण्यात येत असून, उर्वरित पदे भरण्याच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागामार्फत अध्यक्षांच्या पदांच्या समकक्ष पदावरील अधिकाऱ्यांकडून इच्छुकता मागविण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देण्याबाबत

(१२) * ३५९७२ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.रामहरी रुपनवर, श्री.हरिसिंग राठोड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.अपूर्व हिरे, श्री.कपिल पाटील, श्री.रविंद्र फाटक, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयंत पाटील, डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.प्रकाश गजभिये, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.मोहनराव कदम, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड,

श्री.जनार्दन चांदूरकर, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.जगन्नाथ शिंदे : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देण्यासाठी शेतकरी तसेच लोकप्रतिनिधींनी काढलेली संघर्ष यात्रा, संप व आंदोलनामुळे छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेंतर्गत दिनांक २८ जून, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये रुपये ३४ हजार कोटीची कर्जमाफी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्यक्षात केवळ रुपये ५ हजार कोटी पेक्षाही कमी कर्जमाफी देण्यात आली असणे, कर्जमाफीसाठी अनेक निकष व अटी घालण्यात येऊन तातडीची मदत म्हणून शेतकऱ्यांना रुपये १० हजार देणे तसेच दिवाळीपूर्वी संपूर्ण कर्जमाफी करण्यात येणार असल्याची घोषणा शासनाने केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी कार्यवाही न झाल्यामुळे विदर्भातील अमरावतीमध्ये-१९७ व इतर जिल्ह्यात-१८७, मराठवाडयात-१५६, उत्तर महाराष्ट्रातील नाशिकमध्ये-३८३ व इतर जिल्ह्यात-७७, पश्चिम महाराष्ट्रात-२६ व कोकणात-३ अशा राज्यात एकूण-१०२९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या योजनेच्या अंमलबजावणीसाठी रुपये २० हजार कोटीचे कर्ज घेण्यासाठी केंद्र शासनाने राज्य शासनाला परवानगी दिली असल्याने माहे ऑक्टोबर, २०१७ अखेर किती व कोणत्या बँकांनी निधी उपलब्ध करुन दिला आहे तसेच निधी पुरविण्याबाबत बँकांचे निकष काय आहेत, त्यानुसार कोणकोणत्या जिल्हा मध्यवर्ती बँकांना कळविण्यात आले आहे व सदर बँकांनी प्रत्येकी किती निधी उपलब्ध करुन दिला आहे,

(५) असल्यास, उपरोक्त योजनेंतर्गत दिनांक २२ सप्टेंबर, २०१७ रोजीपर्यंत किती शेतकऱ्यांनी कर्जमाफीसाठी अर्ज केले आहेत, त्यापैकी किती शेतकरी पात्र व अपात्र ठरले आहेत, कर्जमाफीसाठी असलेले निकष व अटींची पूर्तता करताना येत असलेल्या अडचणींमुळे कर्जमाफी होत नसल्याने अनेक शेतकरी आत्महत्या करीत असल्याने राज्यातील सर्व शेतकऱ्यांना तात्काळ कर्जमाफी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) वेगवेगळ्या नैसर्गिक आपत्तीच्या पार्श्वभूमीवर, शेतकऱ्यांचे नुकसान झाल्यामुळे बरेच शेतकरी पीक कर्जाची / शेती कर्जाची मुदतीत परतफेड करू शकले नाहीत. परिणामी हे शेतकरी थकबाकीदार राहिल्यामुळे अशा शेतकऱ्यांना बँकांकडून नव्याने पीक कर्ज घेण्यास अडचणी निर्माण झाल्या आहेत. ही बाब विचारात घेऊन शासन निर्णय, दिनांक २८/६/२०१७ अन्वये छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना, २०१७ लागू करण्यात आली आहे. त्यानुसार काही निकषांच्या अधीन राहून शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

(२) शासनाने दिनांक २८/०६/२०१७ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील शेतकरी कर्जमाफीकरीता छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना, २०१७ लागू केली आहे. सदर शासन निर्णयात कर्जमाफी व प्रोत्साहनपर लाभासाठीच्या पात्रतेबाबतचे निकष नमूद केले आहेत.

सदर योजनेची अंमलबजावणी करण्यापूर्वी थकबाकीदार शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करण्यासाठी शासनाने दिनांक १४/०६/२०१७ रोजी शासन निर्णय निर्गमित केला असून सदर योजनेंतर्गत खरीप २०१७ साठी ५३९६१ शेतकऱ्यांना रुपये ५२ कोटी ७७ लाख इतके कर्ज शासन हमीवर बँकांनी संबंधित शेतकऱ्यांना अदा केले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना, २०१७ चा शुभारंभ दिनांक १८/१०/२०१७ रोजी करण्यात आला असून दिनांक ०४/१२/२०१७ अखेर शेतकऱ्यांच्या एकूण १३.४९ लाख कर्ज खात्यावरील रुपये ८६१०.६४ कोटी इतक्या रक्कमेचे कर्ज माफ करण्यासाठी शासनाकडून संबंधित बँकांना रक्कम वर्ग करण्यात आली आहे. बँकांकडून संबंधित शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यावर रक्कमा वर्ग करण्याची कार्यवाही सुरू असून दिनांक ०४/१२/२०१७ अखेर रुपये ५१४१.९७ कोटी इतकी रक्कम शेतकऱ्यांच्या ९.४३ लाख कर्जखाती वर्ग करण्यात आली आहे. उर्वरीत लाभार्थ्यांना तपासणीअंती लाभ देण्याची प्रक्रिया चालू आहे.

(३) जानेवारी, २०१७ ते ऑक्टोबर, २०१७ या कालावधीमध्ये विदर्भातील अमरावतीमध्ये - ९०७ व इतर जिल्ह्यात - २२६, मराठवाड्यात - ७८९, उत्तर

महाराष्ट्रात - ४०८, पश्चिम महाराष्ट्रात - ८० व कोकणात - ४ अशा राज्यात एकूण-२४१४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे प्राप्त माहितीवरून निदर्शनास येते.

(४) छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ या योजनेच्या अनुषंगाने दिनांक २२/९/२०१७ अखेर शेतकऱ्यांनी ५६.५९ लाख ऑनलाईन अर्ज केले. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व राष्ट्रीयकृत बँका यांच्या खाती शासनाने दिनांक ०४/१२/२०१७ अखेर रक्कम रूपये ८६१०.६४ कोटी एवढी वितरीत केली असून त्यापैकी शेतकऱ्यांच्या ९.४३ लाख कर्ज खाती दिनांक ०४/१२/२०१७ पर्यंत रूपये ५१४१.९७ कोटी एवढी रक्कम वर्ग करण्यात आली असून, उर्वरीत रक्कम वर्ग करण्याचे काम सुरू आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना रूपये २७७१.५४ कोटी एवढा निधी उपलब्ध करून दिला असून, राष्ट्रीयकृत, ग्रामीण व खाजगी बँकांना रूपये ५८३९.१० कोटी एवढा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

(५) छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेसाठी कर्जदार शेतकऱ्यांच्या कर्ज खात्याची एकूण संख्या ७१.११ लाख इतकी आहे. कर्जमाफीसाठी प्रत्यक्षात शेतकऱ्यांनी ५६.५९ लाख ऑनलाईन अर्ज सादर केले आहेत. सदर योजनेच्या लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देण्याची कार्यवाही सुरू आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

सामाजिक न्याय विभागाच्या विशेष शाळा व कर्मशाळांच्या गैरसोईंबाबत

(१३) * ३५२१३ श्री.कपिल पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २८४८४ ला दिनांक ७ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागांतर्गत चालविण्यात येणाऱ्या विशेष शाळा व कर्मशाळांना अनुदान न मिळणे, जुन्या अपंगांच्या संस्थांना अनेक वर्षापासून कर्मचारी पदे मंजूर झालेली नसणे तसेच रिक्त होणाऱ्या विशेष शिक्षकांच्या पदासाठी एनओसीची मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १८ वर्षे पूर्ण केलेल्या विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या पुनर्वसनासाठी कर्मशाळा उभारण्याबाबत शासनाचे धोरण काय आहे,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजकुमार बडोले : (१) दिव्यांगांसाठी असलेल्या विशेष शाळा व कर्मशाळांकरीता वेतन व वेतनेतर अनुदानासाठी सन २०१७-१८ मध्ये उपलब्ध झालेली संपूर्ण तरतूद वितरीत करण्यात आली आहे. दिव्यांगांच्या विशेष शाळांकरीता सुधारीत आकृतिबंध मंजूर करण्यात आला असून त्यानूसार अतिरीक्त ठरणारी पदे समायोजीत करुन तसेच मा.न्यायालयाने दिलेले आदेश विचारात घेवून नवीन पदे मंजूर करण्याचे प्रस्तावित आहे. मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार बंद पडलेल्या विशेष शाळा/ कर्मशाळांमधील कर्मचाऱ्यांचे अन्यत्र समायोजन व्हावे यासाठी रिक्त पदे भरण्याकरीता अपंग आयुक्तालयाकडून एन.ओ.सी. देण्यात येते.
(२) राज्यात विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी ८६ अनुदानित कर्मशाळा कार्यरत आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

डोंबिवली (जि.ठाणे) येथील औद्योगिक वसाहतीतील भूखंडाच्या गैरव्यवहाराबाबत

(१४) * ३४९५७ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डोंबिवली (जि.ठाणे) औद्योगिक वसाहतीतील भूखंडाचा दर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे परिपत्रक क्र. मऔविमं/ए०७३७०, दिनांक ७ ऑक्टोबर, २०१६ नुसार औद्योगिक वापरासाठी प्रति चौ.मी. रुपये १३२५०/-, निवासी वापरासाठी रुपये २६५००/- आणि व्यापारी (वाणिज्यिक) वापरासाठी

रुपये ३९७००/- इतका दर प्रस्तावित करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डोंबिवली येथील मे.रूप मार्बल या व्यावसायिकाला दिनांक १९ मे, २०१६ रोजी ए-१६८/१ हा ३००० चौ.मी. भूखंड सिरामिक टाईल्स कटिंग आणि पॉलीशिंग करण्यासाठी अर्थात वाणिज्यिक वापरासाठी रुपये १२३२०/- या दराने दिला असल्याने शासनाचे सुमारे रुपये आठ कोटी पेक्षा अधिक रकमेचे नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याच भूखंडावर डोंबिवली औद्योगिक परिसरातील कंपन्यातून होणाऱ्या प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी 'निसार उद्यान' उभारण्यात येणार असल्याचे दिनांक १४ ऑगष्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास माहितीच्या अधिकारात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देसाई : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सिरामिक टाईल्स आणि पॉलिशिंग हा उद्योग ओद्योगिक प्रयोजनात येत असल्याने महामंडळाच्या संचालक मंडळाचा ठराव क्रमांक ५४२९ व MMC ची या भूखंड वापरास वाणिज्यिक मधून औद्योगिक वापरासाठी मान्यता देण्यात आली आहे.

(३) हे अशंत: खरे आहे.

डोंबिवली वेलफेअर असोशिएशन (रजि) तर्फे निसर्ग उद्यान वापराबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे प्राप्त असून त्याबाबतची छाननी महामंडळ स्तरावर सुरु आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

रत्नागिरी जिल्हयात महावितरणकडून ग्राहकांना नवीन वीज मीटर उपलब्ध करुन देण्याबाबत

(१५) * ३५८८७ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, आर्कि.अनंत गाडगीळ : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयात महावितरणकडून ग्राहकांना देण्यात आलेल्या रोलॅक्स व प्लॅश कंपनीचे वीज मीटर सदोष असल्याने ग्राहकांना जादा वीज देयके येत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज मीटर बदलण्यासाठी ग्राहकांनी केलेल्या मागणीपैकी केवळ १० टक्केच वीज मीटर महावितरणकडे उपलब्ध असल्याने नवीन वीज मीटर जोडण्या प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन नवीन जादा वीज मीटर उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे खरे नाही.

मे.रोलेक्स व मे.फ्लॅश कंपनीचे वीज मीटर सदोष असल्याचे नोव्हेंबर, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे येथील कर्वेनगर येथे वसतिगृह सुरु करण्याबाबत

(१६) * ३५२६६ श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा

खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील कर्वेनगरमधील कर्वे समाजसेवा संस्थेच्या विद्यार्थ्यांसाठी असलेले बंद वसतिगृह सुरु करण्याची मागणी अतिरिक्त समाजकल्याण आयुक्तांकडे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर वसतिगृह पुन्हा सुरु करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजकुमार बडोले : (१) होय.
(२) होय.

प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, पुणे यांचेमार्फत सदर प्रकरणी चौकशी करण्यात आलेली आहे.

सदर वसतिगृहास शासनाचे कोणतेही अनुदान मिळत नसून ते जून, २०१७ पासून बंद आहे. या वसतिगृहातील प्रवेशित विद्यार्थ्यांची व्यवस्थापनाने इतर वसतिगृहात योग्य व्यवस्था केली आहे.

सदर वसतिगृहाची मालकी खाजगी स्वरुपाची असल्याने शासनस्तरावर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीच्या गैरव्यवहाराची पुन्हा चौकशी करण्याबाबत

(१७) * ३४९६८ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.रविंद्र फाटक, श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.सुभाष झांबड, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.अमरनाथ

राजूरकर, श्री.रामराव वडकुते, श्री.जयंत पाटील : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सामाजिक न्याय व इतर आठ विभागामार्फत मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीचा लाभ चालू वर्षी ५५ लाख विद्यार्थ्यांपैकी एकालाही देण्यात आला नसणे, बनावट विद्यार्थी दाखवणे तसेच ऑनलाईन नोंदणी करताना केलेल्या रुपये २१७४ कोटीच्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती गैरव्यवहार प्रकरणी विशेष तपास पथकाने (एसआयटी) ६४ शैक्षणिक संस्थांवर गुन्हे दाखल केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ६४ संस्थांची नावे काय आहेत, त्यांनी प्रत्येकी किती रक्कमेचा अपहार केला आहे तसेच अपहार केलेल्या रक्कमेपैकी अद्यापपर्यंत प्रत्येक संस्थेकडून किती रक्कम वसूल करण्यात आली आहे,

(३) असल्यास, सदर गैरव्यवहार प्रकरणी विशेष तपास पथकाने (एसआयटी) केलेली चौकशी मान्य नसल्याने अहवालाच्या आधारे पुन्हा स्वतंत्र चौकशी करण्याच्या घेतलेल्या निर्णयानुसार पुन्हा चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, मा.सामाजिक न्याय मंत्री यांनी दिनांक २७ जुलै, २०१७ रोजी आश्वासन देऊनही उक्त प्रकरणी कारवाई न झाल्याने याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजकुमार बडोले : (१) अंशत: होय.

सन २०१७-१८ पासून सर्व विभागांच्या शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क, शिष्यवृत्ती व निर्वाह भत्ता योजनांकरीता राज्य शासनाने महाडिबीटी पोर्टल सुरु केले आहे. सदर पोर्टलवरील तांत्रिक अडचणींमुळे चालू वर्षाच्या पहिल्या सत्राच्या देय रक्कमेच्या ६० टक्के इतकी रक्कम संबंधित पात्र विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर जमा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती गैरव्यवहार प्रकरणी विशेष तपास पथकाने ६४ शैक्षणिक संस्थांवर गुन्हे दाखल केलेले नाहीत.

(२), (३) व (४) विशेष चौकशी पथकाच्या अहवालातील एकुण १७०४ संस्थांच्या लेखापरीक्षणाच्या अनुषंगाने विश्लेषण व पडताळणी करण्याची कार्यवाही आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांच्यामार्फत सुरु असून, अनियमिततेच्या रुपये १८२६.८७ कोटी रक्कमेपैकी आतापर्यंत रुपये ९६.१६ कोटी इतकी वसुलपात्र रक्कम संस्थाकडून वसूल करुन कोषागारात भरणा करण्यात आली असून रुपये ६८५.४१ कोटी इतक्या अग्रिम रक्कमेचे समायोजन करण्यात आलेले आहे. तसेच संबंधित शैक्षणिक संस्थाकडून

उर्वरीत वसुलपात्र रक्कमेच्या वसुलीची कार्यवाही संबंधित सहायक आयुक्तांमार्फत सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात महावितरण आणि महानिर्मितीमधील अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

(१८) * ३५८९६ आर्कि.अनंत गाडगीळ : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वीज अतिरिक्त असल्याचा शासनाने दावा केला असला तरी महावितरण आणि महानिर्मिती व इतर वीज कंपन्यांमधील अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे राज्यात मोठया प्रमाणावर विजेचे भारनियमन सुरु असल्याचे माहे आक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज उत्पादन केंद्रातील ३० पैकी १३ युनिट बंद पडले असून २४ तासांत त्यातील तांत्रिक त्रुटी दूर करणे आवश्यक असतांना तेथील अधिकारी दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन दोषी अधिकारी व कंपन्यांवर कारवाई करणे तसेच राज्यातील विजेचे भारनियमन दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) राज्यातील औष्णिक विद्युत केद्रांना होणारा कोळशाचा पुरवठा कमी झाल्याने त्याचा विपरित परिणाम वीजनिर्मिती व पर्यायाने वीज पुरवठयावर झाला होता. राज्यात ०३ ऑक्टोबर ते ७ ऑक्टोबर दरम्यान (५ दिवस) काही कालावधीसाठी तात्पुरते भारनियमन करावे लागले होते.

(२) हे खरे नाही.

(३) महावितरणने भारनियमनाचे प्रमाण कमी करण्यासाठी खालील

उपाययोजना केलेल्या आहेत.

१. लघुकालीन निविदेव्दारे १५ ऑक्टोबर पर्यंत १४५० मे.वॅ. व तद्नंतर ३१ ऑक्टोबर पर्यंत ११०० मे.वॅ. वीज खरेदी करण्यात आली व गरजेनुसार काही कालावधीसाठी पॉवर एक्सेजमधुन ०१ दिवस अगोदर मागणी नोंदवून (Day Ahead Basis) वीज खरेदी करण्यात आली.
२. महावितरणने मा.वीज नियामक आयोगाकडे रुपये ४ प्रति युनिट पेक्षा जास्त दराने खरेदी करणेसाठी याचिका दाखल करुन त्यानुसार मा.वीज नियामक आयोगाची परवानगी घेतली. लघुकालीन खरेदीव्दारे माहे ऑक्टोबर महिन्यात एकूण ६१९.७४ दशलक्ष युनिट, रुपये ३.९६ प्रति युनिट दराने खरेदी केले.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

(१९) * ३६००६ श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.दत्तात्रय सावंत, डॉ.सुधीर तांबे, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.रविंद्र फाटक, श्री.सुभाष झांबड, श्री.आनंदराव पाटील, श्री.हरिसिंग राठोड : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये नवी मुंबईतील व्यापाऱ्यांशी संगनमत करुन सेवा शुल्क वसुली न करणे तसेच चटईक्षेत्र निर्देशांक (एफएसआय) आणि ठेवींवर बोगस कर्जांचे वाटप करुन रुपये २०० कोटीचा गैरव्यवहार केला असून या गैरव्यवहाराच्या चौकशीकरिता व्दिसदस्यीय समिती नेमण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त गैरव्यवहाराची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार सेवा शुल्क वसूल न करण्याची कारणे काय आहेत तसेच सदर सेवाशुल्क किती कालावधीत वसुल करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) व (२) सेवाशुल्क आकारणी/वसूलीबाबत वस्तुस्थितीदर्शक अहवाल घेण्यासाठी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या दिनांक २८/९/२०१७ रोजीच्या आदेशान्वये व्दिसदस्यीय समिती नेमण्यात आलेली आहे. सदर समितीचा अहवाल अद्यापि प्राप्त झालेला नाही. या प्रकरणी आवश्यकता भासल्यास शासनामार्फत चौकशी करुन दोषी अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द कारवाई करण्यात येईल.

तसेच चटईक्षेत्र निर्देशांकाबाबत मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल असून देना बँकेतील ठेवीबाबतचे प्रकरणात सीबीआय मार्फत तपास होऊन विशेष न्यायालय, मुंबई येथे आरोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे. दोन्ही बाबी न्यायप्रविष्ट आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात उद्योग गुंतवणूकीमध्ये घट झाल्याबाबत

(२०) * ३४९६१ श्री.संजय दत्त, श्री.तानाजी सावंत : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मेक इन इंडियाच्या माध्यमातून उद्योग क्षेत्रात सुमारे ११ लाख ३७ हजार ७८३ कोटींची दावा करण्यात आला असला तरी प्रत्यक्षात केवळ रुपये २ लाख ६९ हजार ८१० कोटींची गुंतवणूक झाली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात मागील अडीच वर्षाच्या काळात उद्योगांच्या संख्येत ५२२ ने घट झाली असून गुंतवणुकीच्या प्रमाणात ७.५ टक्क्यावरुन ६.७ टक्के घसरण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नविन उद्योगांना गुंतवणूकीसाठी आकर्षित करुन उद्योगांच्या संख्येत वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देसाई : (१) मेक इन इंडिया सप्ताह दरम्यान उद्योग विभागाशी निगडीत एकूण २८५० सामंजस्य करार झाले व त्याव्दारे एकूण रुपये ४.१३ लक्ष कोटी गुंतवणुक अपेक्षित होती. यासंदर्भात प्रत्यक्ष अंमलबजावणी २४५६ सामंजस्य करारात झाली असून त्याव्दारे रुपये १ लक्ष ९० हजार कोटींची गुंतवणुक प्रत्यक्ष साकार होत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) नविन उद्योग आकर्षित करण्यासाठी सामुहिक प्रोत्साहन योजना २०१३ च्या माध्यमातून उद्योगांना तालुका गटाच्या वर्गवारीप्रमाणे विविध प्रोत्साहने देण्यात येत आहेत. राज्यात विविध उद्योग आकर्षित करण्यासाठी उद्योग क्षेत्रनिहाय विशेष धोरण आखुन त्यांना विशेष प्रोत्साहने देवू केली आहेत. महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान धोरण, इलेक्ट्रॉनिक्स व फॅब धोरण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अ.जा. व अ.ज. विशेष प्रोत्साहन योजना व नुकतेच महिला उद्योजकांसाठी विशेष धोरण विहीत करुन उद्योगांना पोषक वातावरण तयार करण्यात येत आहे.

तसेच मेक इन महाराष्ट्र व तपासणे Esse of Doing Business उपक्रमाच्या माध्यमातून उद्योगांसाठी विविध सुधारणा केल्या आहेत.

मैत्री कक्षा मार्फत उद्योगांना आवश्यक सुविधा व ना हरकती/परवाने सुलभ व जलदरित्या देण्यासाठी ऑनलाईन एक खिडकी प्रणालीव्दारे विविध सेवा देण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील अनुसूचित जाती व जमातीचे जातीचे दाखले काढण्यासाठीची अट शिथिल करण्याबाबत

(२१) * ३५६८६ श्री.जयंत पाटील : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कोळी व ठाकूर आदिवासी समाजासाठी अनुसूचित जाती व जमातीचे जातीचे दाखले काढण्यासाठी सन १९५० पूर्वीचे पूरावे सादर

करण्याची अट लागू करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्ह्यातील कोळी व ठाकूर आदिवासी समाजासाठी शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध नसल्यामुळे सदर समाज शिक्षणापासून वंचित राहिल्याने त्यांच्याकडे कोणतेही दाखले तसेच शासन दरबारी तशी नोंद नसल्याने त्यांना सन १९५० पूर्वीचा पुरावा सादर करताना अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जातीचा दाखला नसल्याने सदर समाजातील नागरीक शासनाच्या विविध योजनांपासून वंचित रहात असल्याने त्यांनी सन १९५० पूर्वीचे पूरावे सादर करण्याची अट शिथील करण्याची मागणी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.विष्णु सवरा : (१), (२), (३) व (४) संबंधित अधिनियमांतर्गत केलेल्या नियमांमधील नियम ३ (३) नुसार उमेदवाराने कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. परंतु नियम ३(४) मधील तरतूदीनुसार अर्जदार दस्तऐवज सादर करण्यास असमर्थ असेल तर अर्जदाराने त्याबाबतची कारणे नमुद करुन सक्षम अधिकाऱ्यास शपथपत्र सादर करावयाचे आहे. त्या शपथपत्रावर सक्षम प्राधिकाऱ्याने विचार करुन तसेच योग्य चौकशी करुन गुणावगुणांवरुन (on merit) दाव्याचा निर्णय घ्यावा, अशी तरतुद आहे.

परंतु सामाजिक न्याय विभागाच्या शासन निर्णय दिनांक ६/२/२०१० अन्वये अनुसूचित जाती या प्रवर्गातील व्यक्तींना दिनांक १०/८/१९५० रोजी व तत्पूर्वी त्यांचा राज्यातील सर्वसाधारण रहिवास असण्याची अट विहित करण्यात आली. नियम, २०१२ मध्ये सदर अटीचा समावेश करण्यात आलेला आहे.

मा.उच्च न्यायालयाने रिट पिटीशन क्र.६०६०/२००८ कु.श्वेता शांतालाल लाल विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर या प्रकरणात दिनांक १०/८/१९५० रोजी महाराष्ट्र राज्यात मूळ निवास नसलेली अनुसूचित जातीच्या व्यक्तीस अनुसूचित जातीकरिता राखीव असलेल्या सवलतींचा लाभ घेता येणार नाही, त्या व्यक्तीस त्याच्या मूळ राज्यात अशा सवलतींचा लाभ मिळेल असा महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

पंढरपूर येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना करणेबाबत

(२२) * ३५६२० श्री.दत्तात्रय सावंत, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.बाळाराम पाटील, श्री.श्रीकांत देशपांडे : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.पंढरपूर) हे श्री क्षेत्र विठ्ठल मंदिर देवस्थान असून उद्योगधंद्याच्या उभारणीसाठी आवश्यक रेल्वे स्थानक, मुबलक पाणी, रस्ते व जमीन या सर्व सुविधा तसेच या शहरातून दोन राष्ट्रीय महामार्ग जाणार असल्याने पंढरपूर येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाची स्थापना करण्याची मागणी स्थानिकांकडून होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंढरपूर येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाची स्थापना करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देसाई : (१) अंशत: खरे आहे.

लोकप्रतिनिधींची मागणी आहे मात्र स्थानिकांकडून मागणी प्रस्ताव नाही.

(२) मौजे भाळवणी येथे औद्योगिक क्षेत्र प्रस्तावित करण्यात आले होते मात्र सदर क्षेत्रासाठी पाण्याचा शाश्वत स्त्रोत उपलब्ध न झाल्याने औद्योगिक क्षेत्र होऊ शकले नाही. तथापी पाणी आरक्षण प्राप्त झाल्यास व भूसंपादनास शेतकऱ्यांची लेखी संमती प्राप्त झाल्यास पंढरपूर तालुक्यात भूसंपादन कार्यवाही करून औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्याबाबत विचार करता येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर व वर्धा जिल्ह्यातील शिष्यवृत्ती गैरव्यवहारातील दोषींवर कारवाई करण्याबाबत

(२३) * ३५५५० श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २००९-१० पासून अनेक जिल्ह्यात केंद्र शासनाच्या शिष्यवृत्ती वाटप गैरव्यवहार प्रकरणी सामाजिक न्याय व इतर विभागामार्फत गठीत केलेल्या चौकशी समितीने नागपूर व वर्धा जिल्ह्यातील प्रकरणांची चौकशी पूर्ण करून माहे मे, २०११ मध्ये वा त्यादरम्यान शासनास अहवाल सादर केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौकशी समितीने गैरव्यवहारातील अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई न करता केवळ सहाय्यक समाजकल्याण उपायुक्त, श्री.एस.एम.कांडलकर यांना दिनांक ३१ जुलै, २०१५ रोजी तसेच समाजकल्याण विभागाचे नागपूर येथील प्रादेशिक उपायुक्त, श्री.एम.एस.झोड यांना दिनांक ३१ ऑगस्ट, २०१७ रोजी विभागीय चौकशीच्या अधिन राहून त्यांचे निलंबन केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने फेरविचार करून दोषी अधिकाऱ्यांविरुध्द योग्य कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजकुमार बडोले : (१) अंशत: होय.

वर्धा जिल्ह्यात सन २००५ ते २०१० या कालावधीमध्ये शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क व शिष्यवृत्ती वाटपातील अनियमितते संदर्भात सहायक संचालक (लेखा) विभागीय समाजकल्याण अधिकारी, अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेल्या समितीने माहे जून, २०११ मध्ये शासनास अहवाल सादर केला आहे.

(२) नाही,

(३) या प्रकरणी दोषी अधिकारी, कर्मचारी यांच्याविरुध्दच्या प्रस्तावाची छाननी करुन त्यांच्याविरुध्द दोषारोपपत्र बजावण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

डहाणू, पालघर, तलासरी व वसई (जि.पालघर) तालुक्यातील विद्यार्थी-विद्यार्थीनी वसतिगृहापासून वंचित असल्याबाबत

(२४) * ३५३३१ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू, पालघर, तलासरी व वसई (जि.पालघर) या आदिवासी विकास विभाग प्रकल्पांतर्गत येणाऱ्या तालुक्यात वसतिगृह व आश्रमशाळांचे प्रमाण कमी असल्यामुळे ६६६ आदिवासी विद्यार्थी/ विद्यार्थीनी वसतिगृहांपासून वंचित असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने वसतिगृहांपासून वंचित असलेल्या विद्यार्थी/ विद्यार्थ्यांना वसतिगृह उपलब्ध करुन देणे व आश्रमशाळांमध्ये वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.विष्णु सवरा : (१) हे खरे आहे.

(२) सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरिता पेण प्रकल्पामधील ५०० विद्यार्थी क्षमता डहाणू प्रकल्पामध्ये आणि सोलापूर प्रकल्पामधील ४०० विद्यार्थी क्षमता जव्हार प्रकल्पामध्ये वर्ग करण्यात आलेली आहे. अशाप्रकारे सन २०१७-१८ करिता पालघर जिल्ह्यासाठी एकूण ९०० विद्यार्थी क्षमता वाढविण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

दत्तरामपूर (ता.आर्णी, जि.यवतमाळ) येथील शेतकऱ्यांना सोयाबीन अनुदान योजनेचा लाभ देण्याबाबत

(२५) * ३४८२१ श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर :

सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दत्तरामपूर (ता.आर्णी, जि.यवतमाळ) येथील खाजगी बाजार व थेट पणन अनुज्ञप्ती धारक सोयाबीन विक्री केलेल्या शेतकऱ्यांना सोयाबीन अनुदान योजनेचा लाभ देण्याबाबतची मागणी शेतकरी कृषी खाजगी बाजार समितीने दिनांक ८ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) होय.

(२) ज्या खाजगी बाजार व थेट पणन परवानाधारक यांनी सोयाबीन खरेदी-विक्रीची अचुक माहिती त्याचवेळी विहीत अभिलेख्यामध्ये ठेवून, दररोज सोयाबीन खरेदी-विक्रीची माहिती कृषि पणन मंडळाच्या वेबसाईटवर त्याचवेळी भरली आहे अशाच प्रकरणी अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे प्राप्त निवेदन तपासणीसाठी क्षेत्रीय कार्यालयास पाठविण्यात आले आहे. क्षेत्रिय कार्यालयाकडून याबाबत अहवाल प्राप्त झाल्यानंतर, प्रस्तावाची योग्यता तपासून त्यावर निर्णय घेण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील गैरव्यवहाराबाबत

(२६) * ३५३८४ श्री.गिरीशचंद्र व्यास : तारांकित प्रश्न क्रमांक ३३१९९ ला दिनांक ३ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे दिनांक १५ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदर गैरव्यवहाराची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) नाही, हे खरे नाही.

अशी कोणतीही तक्रार/निवेदन प्राप्त झालेले नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात विशेषत: रायगड, रत्नागिरी तसेच ठाणे जिल्ह्यातील आदिवासी आश्रमशाळांच्या दुरवस्थेबाबत

(२७) * ३५१७० श्री.रविंद्र फाटक : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: रायगड, रत्नागिरी तसेच ठाणे जिल्ह्यातील शहापूर व इतर तालुक्यातील आदिवासी आश्रमशाळांची दुरवस्था झाल्याचे माहे ऑक्टोंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील अनुदानित ५५५ आणि विनाअनुदानित ५५६ निवासी आश्रमशाळांसाठी अर्थसंकल्पात कोटयवधी रुपयांची वार्षिक तरतुद करुनही शहापूर, जव्हार, वाडा, मोखाडा इ. तालुक्यातील आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त आदिवासी आश्रमशाळांची शासनाने पाहणी/चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार आदिवासी आश्रमशाळांना सोयी-सुविधा पुरविणे व यास जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.विष्णु सवरा : (१) व (२) ठाणे विभागांतर्गत प्रकल्पाच्या अधिनस्त ८९ शासकीय आश्रमशाळांच्या ठिकाणी इमारत बांधकामांना प्रशासकीय मंजूरी प्राप्त असून त्यापैकी ३४ शासकीय आश्रमशाळांची बांधकामे पूर्ण होऊन हस्तांतरीत झालेली आहेत. १८ आश्रमशाळांचे काम पूर्णत्वावर असून, १७ आश्रमशाळांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे व २० आश्रमशाळांचे बांधकाम तांत्रिक कारणास्तव सुरु झालेली नाही. १२७ आश्रमशाळांच्या विद्यार्थ्यांसाठी

३७७ व विद्यार्थीनीसाठी ३०२ स्नानगृहे आहेत.

ठाणे विभागांतर्गत प्रकल्पाच्या अधिनस्त शासकीय आश्रमशाळाच्या विद्यार्थ्यांसाठी ३६७ व विद्यार्थीनीसाठी ३०१ शौचालये उपलब्ध आहेत. तसेच सर्व आश्रमशाळेमध्ये पाणीपुरवठा, विद्युत व्यवस्था इत्यादी सुविधा उपलब्ध आहेत.

ठाणे विभागांतर्गत कार्यरत एकूण ७१ अनुदानित आश्रमशाळांपैकी ६७ इमारती हया संस्थेच्या मालकीच्या असून ४ इमारती भाडयाच्या आहेत. ७१ अनुदानित आश्रमशाळांच्या विद्यार्थ्यांसाठी ५५५ व विद्यार्थ्यांसाठी ६५७ स्नानगृहे आहेत. अनुदानित आश्रमशाळांच्या विद्यार्थ्यांसाठी ६७६ व ७२५ विद्यार्थ्यांनींसाठी शौचालये उपलब्ध आहेत. तसेच सर्व आश्रमशाळेमध्ये पाणीपुरवठा, विद्युत व्यवस्था इत्यादी सुविधा उपलब्ध आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

गोकुंदा व किनवट (जि.नांदेड) शहरात नियमित वीज पुरवठा करण्याबाबत

(२८) * ३५५७१ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोकुंदा व किनवट (जि.नांदेड) शहरात दिनांक १३ सप्टेंबर, २०१७ पासून वीज ग्राहकांना कोणतीही पूर्वसूचना न देता ६ तासाचा भारनियम, फ्युजकॉल व विदयुततारा तुटणे इत्यादी कारणांमुळे १२ तास वीज पुरवठा खंडित होत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोकुंदा व किनवट आदिवासी नक्षलप्रवण भाग असल्याने येथे अखंडित वीज पुरवठा करण्याचे शासनाचे धोरण असल्याने वीज वितरणाचे नियोजन करुन या शहरात नियमित वीज पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) राज्यातील औष्णिक विद्युत केद्रांना होणारा कोळशाचा पुरवठा कमी झाल्याने त्याचा विपरित परिणाम वीजनिर्मिती व पर्यायाने वीज पुरवठयावर झाला होता. दिनांक ०९/०९/२०१७ ते ०७/१०/२०१७ या कालावधीमध्ये काही दिवसांकरिता गरज भासेल तेव्हा मा.वीज नियामक आयोगाच्या निकषानुसार व वीज प्रणालीच्या सुरक्षिततेसाठी, किनवट शहरात वाहिन्यांच्या वितरण व वाणिज्य हानी गटाप्रमाणे भारनियमन करण्यात आले.

(२) मा.वीज नियामक आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार गोकुंदा व किनवट (जि.नांदेड) आदिवासी नक्षलप्रवण भाग असल्याने या शहरात सायंकाळी ६.०० ते सकाळी ६.०० या कालावधीत भारनियमन करण्यात आले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत

(२९) * ३५८३७ प्रा.जोगेन्द्र कवाडे : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीने महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे कर्ज थकविले असून थकित कर्जाच्या वसूलीसाठी बँकेने बाजार समितीच्या नाशिक रोड येथील भूखंडाची नियमबाह्यरित्या विक्री केली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र बँकेने रेडिरेकनरच्या दरापेक्षा अत्यल्प दराने भूखंडाची विक्री केल्याने सुमारे रुपये ६४ कोटीचे बँकेचे व बाजार समितीचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) अंशत: खरे आहे.

नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीचा दिनांक ०१/०४/२०१३ ते दिनांक ३१/०३/२०१४ या कालावधीचा वैधानिक लेखापरीक्षण अहवालात जिल्हा विशेष लेखापरीक्षक, वर्ग-१, सहकारी संस्था, नाशिक यांनी बाजार समितीच्या नाशिक रोड येथील भूखंडाची नियमबाह्यरित्या विक्री कृषी उत्पन्न बाजार समिती, नाशिक यांनी केल्याचे नमूद केले आहे.

(२) कृषी उत्पन्न बाजार समिती, नाशिक व राज्य सहकारी बँकेचे प्रतिनिधी यांनी विक्री केलेल्या भूखंडामुळे बाजार समितीचे सुमारे ६४ कोटीचे नुकसान झाल्याची बाब उक्त अहवालात नमूद आहे.

(३) लेखापरीक्षण अहवालातील शेऱ्यास अनुसरून दिनांक ०३/०८/२०१५ रोजी व दिनांक २६/०८/२०१५ रोजीच्या दुरूस्ती आदेशान्वये महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम ४० अन्वये नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीचे दिनांक ०१/०४/२०१३ ते दिनांक ३१/०३/२०१४ या कालावधीचे वैधानिक लेखापरीक्षण अहवालातील गंभीर मुद्दयांची चौकशी करण्याचे आदेश जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांनी दिले असून श्री.एन.डी.गाधेकर, विशेष लेखापरीक्षक, वर्ग-२, सहकारी संस्था (फिरते पथक), नाशिक यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक केलेली आहे. सदर चौकशी विरूद्ध नाशिक कृषी उत्पन्न बाजार समिती मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. १९६५/२०१६ दाखल केलेली आहे. सदर याचिकेतील दिनांक २२/०२/२०१६ चे आदेशान्वये सदर चौकशीस पुढील आदेश होईपर्यंत स्थगिती दिलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मेंदिपूर, भिवापूर व बरबसपूरा (जि.गोंदिया) येथे अदानी पॉवर कंपनीमुळे होत असलेल्या प्रदुषणाबाबत

(३०) * ३५८९२ श्री.परिणय फुके : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिरोडा (जि.गोंदिया) येथे झुडपी जंगलाच्या नावाखाली शासन गरीबांच्या घरकुलांना मंजूरी देत नाही परंतु अदानी पॉवरला मेंदिपूर, भिवापूर व बरबसपूरा या तीन गावातील १२५ हेक्टर झुडपी जंगलाची जागा शासनाने दिली असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंपनीच्या पॉवर प्लॅन्ट मधील राखेमुळे प्रदूषण निर्माण होऊन स्थानिक नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याने स्थानिक नागरीकांनी जिल्हाधिकारी तसेच संबंधितांकडे तक्रार करुनही कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) अदानी पॉवर कंपनीस राख वापरेचा प्रसार व संशोधन केंद्र स्थापन करण्यासाठी मेंदिपूर येथे १४१.९९ हेक्टर एवढी जमीन, केंद्र सरकारच्या पर्यावरण, वन आणि पर्यावरण बदल (वन संवर्धन विभाग) यांच्या दिनांक ०१/०५/२०१७ च्या आदेशान्वये, काही अटींवर फेज-१ ला तत्वत: मान्यता देण्यात आली असून हस्तांतरणाची पुढील प्रक्रिया सुरु आहे.

(२) व (३) सदर कंपनीकडून सर्व ॲश पॉन्ड यांना LDEE लाईनिंग केलेले आहे. ईलेक्ट्रो सटॅटीक प्रेसिपिटेटर यंत्रणेमधून निघणाऱ्या राखेचे पाण्यामध्ये मिश्रण करुन ॲश पॉन्डमध्ये साठविण्यात येते. सदर राखेचे मिश्रण बनविण्याकरिता पाण्याचा वापर कमी करण्यासाठी HCSD (High Connecentration Slurry Disposal) या तंत्राचा वापर कंपनीकडून करण्यात येऊन राख ॲश पॉन्ड मध्ये साठविण्यात येते. सदर तंत्रामध्ये पाण्याचा वापर अल्प प्रमाणात होत असून राखेचे प्रमाण ७५% व पाण्याचा वापर २५% होतो. सदर तंत्रज्ञानाचा वापर, ५ मार्च, २०१५ पासून सुरु करण्यात आला आहे. ॲश डॉकमधून निघणाऱ्या सांडपाण्याची गुणवत्ता मंडळाच्या विहीत मर्यादेत असल्याबाबत उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, भंडारा यांनी प्रमाणित केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर आदिवासी विभागाच्या पंडीत दिनदयाल उपाध्याय योजनेस विद्यार्थ्यांचा विरोध असल्याबाबत

(३१) * ३४८६७ श्री.हरिसिंग राठोड, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, आर्कि.अनंत गाडगीळ : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर आदिवासी विभागाच्या पंडीत दिनदयाल उपाध्याय योजनेंतर्गत आदिवासी विद्यार्थ्यांना लागणारे बेडिंग, स्टेशनरी, पुस्तके, गणवेश इत्यादी शैक्षणिक साहित्य देण्याऐवजी संबंधित विद्यार्थ्यांच्या खात्यात थेट रक्कम जमा करण्याची योजना विद्यार्थ्यांच्या हिताची नसल्याने यास विद्यार्थी संघटनने विरोध केल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेसाठी मिळणारा निधी अत्यल्प असून आदिवासी विद्यार्थ्यांना विकासापासून वंचित ठेवण्याचे हे षड्यंत्र असल्याने विदर्भातील हजारो विद्यार्थ्यांनी दिनांक २५ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास नागपूर येथे मोर्चा काढला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विद्यार्थ्यांच्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे तसेच याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.विष्णु सवरा : (१) हे खरे आहे.

(२) प्रस्तुत प्रकरणी आदिवासी विद्यार्थी संघ, विदर्भ, नागपूर यांनी दिनांक २५/०९/२०१७ रोजी मोर्चा काढला असल्याची बाब खरी आहे.

(३) सदर संघटनेने डी.बी.टी. योजना बंद करणे, वसतिगृह प्रवेश प्रक्रिया ऑफलाईन राबविणे, पंडीत दीनदयाल उपाध्याय योजना बंद करणे, पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्तीचे वाटप करणे, आश्रमशाळा/वसतिगृहातील विद्यार्थ्यांना

विमा योजना सुरू करणे, वनहक्क कायद्याची अंमलबजावणी करणे, नवीन शासकीय वसतिगृहे बांधणे, जात वैधता प्रमाणपत्र बंधनकारक करून बोगस आदिवासी विद्यार्थी प्रवेश रोखणे, पदोन्नतीमधील आरक्षण कायम ठेवणे इत्यादी मागण्या केलेल्या आहेत.

सदर मागण्यांच्या अनुषंगाने सविस्तर प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना दिनांक २८/११/२०१७ रोजीच्या शासन पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

माळीनगर (ता.माळसिरस, जि.सोलापूर) येथील वीज ग्राहकांची गैरसोय होत असल्याबाबत

(३२) * ३५४९३ श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.शरद रणपिसे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अमरनाथ राजूरकर : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माळीनगर (ता.माळसिरस, जि.सोलापूर) येथील राज्य वितरण कंपनीच्या शाखेंतर्गत सुमारे १३ गावे असून सदर शाखेतील अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे कामे प्रलंबित राहून वीज ग्राहकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त वीज ग्राहकांची गैरसोय दूर करण्याच्यादृष्टीने जादा कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) महावितरण कंपनीच्या माळीनगर शाखा कार्यालयांतर्गत ७ गावे येत असून सदर कार्यालयास एकूण १२ तांत्रिक कर्मचाऱ्यांची पदे मंजूर आहेत. त्यापैकी ०६ पदावर नियमित कर्मचारी कार्यरत असून ६ रिक्त पदांपैकी ०४ रिक्त पदावर बाह्यस्त्रोत कर्मचारी नियुक्त करणेबाबत कार्यादेश देण्यात आले आहेत.

(२) माळीनगर वीज ग्राहकांची गैरसोय दूर करण्यासाठी सदर कार्यालयात विभागीय कार्यालयातून एक तंत्रज्ञाची प्रतिनियुक्तीवर नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच लाईन स्टाफ मध्ये ०४ बाह्यस्त्रोत कर्मचारी नियुक्त करणेबाबत कार्यादेश देण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील खाजगी वीज कंपन्याकडून जादा दराने वीज खरेदी करत असल्याबाबत

(३३) * ३५५९० श्री.गोपिकिशन बाजोरीया : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वीज महानिर्मिती कंपन्यांना कोळसा पुरवठा करणाऱ्या वेस्टर्न कोलफिल्ड लि.च्या (वेकोलि) उत्पादनात सातत्याने वाढ होत असताना आणि त्यांच्याकडून नियमित पुरवठा केला जात असतानाही ऐन दिवाळीच्या वेळी कोळसा टंचाई असल्याचे भासवून खाजगी कंपन्याकडून वीज खरेदी करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृत्रिम कोळसा टंचाईचे कारण सांगून भारनियमन करणे व खाजगी वीज कंपन्याकडून महागडया दरात वीज खरेदी करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

राज्यातील औष्णिक विद्युत केंद्राना होणारा कोळशाचा पुरवठा कमी झाल्याने त्याचा विपरित परिणाम वीजनिर्मिती व पर्यायाने वीजपुरवठयावर झाला होता.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातील इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंटची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत

(३४) * ३५२७१ श्री.सुभाष झांबड : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील ८ व उत्तर महाराष्ट्रातील ३ अशा ११ जिल्हयांतील ग्रामीण भागांत वीज पुरवठयाच्या अनुषंगाने इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंटची कंत्राटदारांनी केलेली कामे निकृष्ट दर्जाची असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने यांस जबाबदार अधिकारी व कंत्राटदार यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी महावितरण कंपनीने चौकशी केली असून तत्कालीन अधिक्षक अभियंता (पायाभूत आराखडा), औरंगाबाद यांचेवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. तसेच संबंधित सहाय्यक अभियंता (पा.आ.) औरंगाबाद विभाग-२ यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे. तसेच मे.कौस्तुम इंजिनिअर्स, औरंगाबाद, मे. दामोदर टेक इंटरनॅशनल प्रा.लि. व मे.बी.व्ही.जी.इंडिया लिमीटेड या एजन्सींनी निकृष्ट दर्जाचे काम केल्यामुळे त्यांना महावितरणच्या काळ्या यादीत समाविष्ट करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. तसेच जळगाव परिमंडळात निकृष्ट दर्जाचे काम केलेल्या संबंधित कंत्राटदाराविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील विशेषत: गडचिरोली जिल्हयातील झाड्या व झाडिया जमातीचा अनुसूचित जमातीच्या सूचीमध्ये समावेश करण्याबाबत

(३५) * ३४९८० श्रीमती विद्या चव्हाण : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्हयातील ७५००० आणि राज्यात इतरत्र १ लाख लोकसंख्या असलेल्या झाडया किंवा झाडिया या जमातीच्या आदिवासी समाजाचा अनुसूचित जमातीच्या सुचित समावेश नसल्यामुळे त्यांना आदिवासींचे संरक्षण देणे व त्यांच्या कल्याणासाठी तयार करण्यात आलेल्या विकास योजनांपासून वंचित रहावे लागत असल्याचे दिनांक ९ ऑगस्ट, २०१७

रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.विष्णु सवरा : (१) व (२) मा.राष्ट्रपती महोदयांनी घोषित केलेली प्रथम यादी तद्नंतर संसदेने वेळोवेळी सुधारणा करुन महाराष्ट्र राज्यासाठी घोषित केलेल्या अनुसूचित जमातीच्या यादीमध्ये झाडया किंवा झाडिया अशी नोंद नाही.

एखाद्या जमातीचा अनुसूचित जमातीच्या यादीत समावेश करण्याबाबत मा.राष्ट्रपतीस भारतीय घटनेच्या कलम ३४२ अन्वये शिफारस करण्यापूर्वी त्या मागणीचा विचार करण्याकरिता अनुसूचित जमातीत समावेश करण्यात यावा अशी मागणी करणाऱ्या जाती-जमातीमध्ये केंद्र शासनाने निश्चित केलेले निकष/लक्षणे आढळून येतात किंवा कसे याची छाननी करण्यासाठी राज्य शासनाने दिनांक ०५/०२/१९८८ च्या शासन निर्णयान्वये कार्यपध्दती विहित केलेली आहे. सदर कार्यपध्दती प्रमाणे, झाड्या किंवा झाडिया या समाजाला अनुसूचित जमातीचा दर्जा मिळण्याबाबत मागणीच्या अनुषंगाने आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचे अभिप्राय मागविण्यात आलेले आहेत. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी विहित प्रपत्रामध्ये माहिती पाठविण्याबाबत संबंधितांना कळविले असून संबंधितांकडून विहित नमुन्यातील प्रपत्रातील माहिती अद्याप पर्यंत प्राप्त झालेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई व इतर शहरात वीज चोरी करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

(३६) * ३५६९५ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईसह राज्यातील प्रमुख शहरात संघटित टोळ्या झोपडयांमध्ये अनधिकृत वीज जोडणी देऊन वीज चोरी करीत असल्याचे माहे ऑगस्ट,

२०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील अनधिकृत वीज जोडणीमुळे वीज कंपन्या व शासन यांचे मोठे नुकसान होत असल्याने वीज चोरी करणाऱ्यांवर मोक्कासारख्या कायद्यांतर्गत कारवाई होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे खरे आहे.

(२) वीज चोरी रोखण्यासाठी महावितरण कंपनीमार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत :-

वीज चोरी शोधण्यासाठी राज्यात ४३ कायमस्वरुपी फिरती पथके स्थापण्यात आली आहेत. याशिवाय विभागीय पातळीवर १२० फिरती पथके स्थापन करण्यात आली आहेत. उपविभागीय पातळीपर्यंत एनर्जी ऑडीट केले जाते व निर्धारित नॉर्मल हानी पेक्षा जास्त वीज वितरण हानी आढळल्यास त्या त्या भागातील वीज ग्राहकांची कसून तपासणी केली जाते. वीज चोरी प्रकरणांचा लवकरात लवकर तपास पूर्ण करण्याच्या उद्देशाने राज्यात ६ ठिकाणी स्वतंत्र पोलीस स्टेशन स्थापण्यात आली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील सांताक्रूझमधील प्रगती को. ऑप सोसायटी लि. संस्थेच्या नावात अनधिकृतरित्या बदल केल्याबाबत

(३७) * **३६२२४ श्री.रामनिवास सिंह :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सांताक्रूझमधील गावदेवी, सुभाषनगर, वाकोला पाईपलाईन, सांताक्रुझ (पूर्व) येथील प्रगती को. ऑप. सोसायटी लि. या संस्थेच्या नावात अनधिकृतरित्या बदल करुन व खोटी कागदपत्रे सादर करुन सांताक्रुझ को. ऑप. क्रेडीट सोसायटीची स्थापना करण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त अधिकृत संस्थेचे अध्यक्ष यांनी सहायक निबंधक, सहकारी संस्था/एच/पूर्व विभाग, मुंबई यांच्याकडे दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१७

रोजी वा त्यासुमारास तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषी संस्थांवर तसेच बोगस कागदपत्रे तयार करणाऱ्या संबंधित कार्यालयातील अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) हे खरे नाही.

प्रगती को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि. या संस्थेच्या नावात व पत्यामध्ये बदल करण्याबाबतची उपविधी दुरुस्ती तत्कालीन सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, एच पूर्व विभाग यांच्या दिनांक १५/०६/२००९ रोजीच्या आदेशान्वये झाली असून सदर संस्थेचे नाव सांताक्रुझ को. ऑप. क्रेडीट सो. लि. असे झाले आहे.
(२) व (३) प्रगती पतसंस्थेच्या अध्यक्षांनी दिनांक ३१/१०/२०१७ रोजी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, एच पूर्व विभाग, मुंबई यांच्या कार्यालयाकडे उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने तक्रार दाखल केली होती.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित सहाय्यक निबंधक कार्यालयाने सांताक्रूझ को.ऑप.क्रे.सो.लि. या पतसंस्थेने मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँकेकडे सादर केलेली कागदपत्रे तपासली. तसेच संबंधित पतसंस्थेने उपविधी दुरुस्तीसाठी सादर केलेली कागदपत्रेदेखील तपासली असून सदर उपविधीमधील दुरुस्ती नियमानुसार झाली असल्याचे त्यांच्या अहवालामध्ये नमूद केले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

निफाड-रानवड (जि.नाशिक) येथील कर्मवीर काकासाहेब वाघ सहकारी साखर कारखान्यातील कर्मचाऱ्यांचे वेतन प्रलंबित असल्याबाबत

(३८) * ३६२५० श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अनिल भोसले, श्रीमती विद्या चव्हाण :

सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निफाड-रानवड (जि.नाशिक) येथील कर्मवीर काकासाहेब वाघ सहकारी साखर कारखान्यातील तीन कर्मचाऱ्यांचे मागील २१ महिन्यांचे वेतन थकीत असल्याने त्यांनी अंगावर रॉकेल ओतून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) होय.

(२) कर्मवीर काकासाहेब वाघ सहकारी साखर कारखाना लि., ता.निफाड, जि.नाशिक हा कारखाना दिनांक ०१/११/२०१२ ते दिनांक ३०/०६/२०१८ या कालावधीसाठी छत्रपती संभाजी राजे साखर उद्योग लि. चित्तेपिंपळगांव ता.जि.औरंगाबाद यांना भाडेपट्टा करारानुसार चालविण्यास दिलेला आहे. सदर कारखान्यातील कामगारांचे माहे मे, २०१५ ते माहे ऑक्टोबर, २०१७ या कालावधीतील थकीत वेतनाची रक्कम रुपये ५.९८ कोटी इतकी आहे.

छत्रपती संभाजी राजे साखर उद्योग लि. यांचेकडील साखर मा.न्यायालयामार्फत जप्त करण्यात आलेली असून साखरेची रक्कम रुपये ५३.२५ कोटी निफाड येथील सत्र न्यायालयात जमा आहे. याबाबत मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल असून सदर रक्कमेचे वाटप करण्यास मा.न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे बावी (जि.उस्मानाबाद) येथील शेतकऱ्याने कर्जमाफीचे प्रमाणपत्र परत केल्याबाबत

(३९) * ३६५३३ श्री.तानाजी सावंत : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे बावी (जि.उस्मानाबाद) येथील छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेतील पात्र शेतकऱ्यावर रुपये १ लाख ४० हजार इतके कर्ज असतांना केवळ रुपये १० हजार कर्जमाफ करण्यात येऊन सदर रक्कम देखील त्याच्या खात्यात जमा करण्यात आली नसल्याने शेतकऱ्याने सदर प्रमाणपत्र शासनास दिनांक २४ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास परत

केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) होय, दिनांक २३ ऑक्टोबर, २०१७ रोजी प्रमाणपत्र परत केलेले आहे. सदर शेतकऱ्याच्या नांवे (श्री.भारत तात्या तांबे) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म. उस्मानाबाद या बँकेचे कर्ज रुपये १०४१२/- असल्यामुळे त्यांना कर्जमाफीबाबतचे रुपये १०४१२/- चे प्रमाणपत्र देण्यात आलेले होते. त्यांनी दिनांक २३/१०/२०१७ रोजी अर्ज देऊन भारतीय स्टेट बँक शाखा उस्मानाबाद या शाखेचे रुपये १,३०,०००/- कर्ज असल्याचे कळवून प्रमाणपत्र परत केले आहे.
(२) त्यानुषंगाने चौकशी केली असता, त्यांच्याकडे भारतीय स्टेट बँक शाखा उस्मानाबाद यांचे रुपये १,४०,०८३/- व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म. उस्मानाबाद यांचे रुपये १०४१२/- असे एकूण रुपये १,५०,४९५/- एवढे कर्ज दिसून आले. छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ च्या शासन निर्णय दिनांक ०८/०९/२०१७ मधील परिशिष्ट अ.क्र. ५ मध्ये नमूद केल्यानुसार थकीत/पुनर्गठीत/फेरपुनर्गठीत कर्जाची रक्कम रुपये १.५० लाखाच्यावर असल्यास एकरकमी परतफेड योजनेनुसार शेतकऱ्यांनी रुपये १.५० लाखावरील थकीत पीक कर्जाची व पुनर्गठनाची/फेरपुनर्गठनाची थकीत/ उर्वरीत हप्त्यांची रक्कम दिनांक ३१/१२/२०१७ पर्यंत भरल्यास त्यांना शासनातर्फे रुपये १.५० लाख रकमेच्या मर्यादेपर्यंत कर्जमाफीचा लाभ देण्यात येतो. त्यानुसार अर्जदारांनी रुपये १,५०,०००/- च्या वरील रक्कम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म. उस्मानाबाद या बँकेमध्ये भरणा केलेली आहे. श्री.भारत तात्या तांबे यांचे नाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या Green List मध्ये आहे. स्टेट बँक ऑफ इंडियाच्या Green List मध्ये त्यांचे नाव असल्याची खात्री करून कर्जमाफीबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

शासकीय परिवहन सेवा कर्मचाऱ्यांच्या पत संस्थेत गैरव्यवहार झालेल्याबाबत

(४०) * ३६५७६ श्री.प्रविण दरेकर : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या राजशिष्टाचार विभागाच्या अखत्यारितील शासकीय परिवहन सेवा कर्मचाऱ्यांच्या पतसंस्थेत रुपये ७९ लाखापेक्षा अधिक रक्कमेचा अपहार झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरव्यवहार प्रकरणी सहकार विभागाने केलेल्या चौकशीत पत संस्थेच्या संचालक मंडळास दोषी ठरविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर दोषी संचालक मंडळावर कोणत्या कलमान्वये कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच कारवाईनुसार संबंधितांकडून रक्कम वसूल करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८८ अन्वये संबंधित प्राधिकृत अधिकाऱ्यांनी दिनांक २७/०४/२०१७ रोजीच्या अहवालानुसार संस्थेच्या १७ संचालकांवर रुपये ७९.६८ लक्ष इतकी आर्थिक नुकसानीची जबाबदारी निश्चित केली.

सदर रक्कम वसूल करण्यासाठी अधिनियमाच्या कलम ९८ अन्वये संस्थेच्या एकूण १७ संचालकांविरुध्द दिनांक ०१/०६/२०१७ रोजी वसूली प्रमाणपत्रे निर्गमित करण्यात आलेली असून संबंधीतांकडून रुपये २,१०,०००/- मुद्दल व रुपये ३,८५,५१०/- व्याज अशी एकूण रुपये ५,९५,५१०/- रक्कमेची वसूली करण्यात आलेली आहे. तसेच संस्थेच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांकडून वसूलीची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

यावल (जि.जळगांव) येथील निविदा बेकायदेशीररित्या बाहेरील जिल्हयातील संस्थेला दिल्याबाबत

(४१) * ३६८२५ श्रीमती स्मिता वाघ : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यावल (जि.जळगांव) येथील जिल्हास्तरीय एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी यांनी शासन निर्णय डावलून बेकायदेशीररित्या निविदा बाहेरील जिल्हयातील मोटर वाहन प्रशिक्षण संस्थेला दिल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.विष्णु सवरा : (१) व (२) हे खरे नाही.

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, यावल यांनी अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांच्या निर्देशानुसार रितसर वृत्तपत्रात जाहिरात देऊन, अभिस्वारस्य प्रस्ताव प्रक्रिया राबवून न्युनतम दर असलेल्या संस्थेस पात्र ठरविले आहे. परंतू सदर संस्था जिल्हयाबाहेरील असल्याने निवडीबाबत आक्षेप आला आहे सदर आक्षेपाच्या अनुषंगाने परिवहन विभागाकडून अभिप्राय मागविण्यांत आले असून ते अद्याप अप्राप्त आहेत. सबब मोटार वाहन प्रशिक्षण योजना अद्याप राबविण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

गोकुळ शिरगाव (ता.कागल, जि.कोल्हापूर) औद्योगिक वसाहतीला नियमित वीज पुरवठा करण्याबाबत

(४२) * ३६८५८ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.सुभाष झांबड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोकुळ शिरगाव (ता.कागल, जि.कोल्हापूर) औद्योगिक वसाहतीच्या विस्तारीकरणासाठी आवश्यक पाच मेगावॅट विजेची मंजूरी असूनही शासकीय अधिकारी व औद्योगिक विकास महामंडळ यांच्या अकार्यक्षमतेमुळे मागील तीन वर्षापासून वीज उपलब्ध न होणे, उपलब्ध वीजेचा पुरवठा अनियमित व वारंवार खंडित होऊन गोकूळ शिरगाव वसाहतीमधील उद्योगांचे प्रति माह रुपये २५० कोटीचे नुकसान होत असणे इ. मागण्यांसदर्भात दिनांक ८ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास आयोजित केलेल्या वार्ताहार परिषदेत गोकुळ शिरगांव मॅन्यूफॅक्चर असोसिएशनच्यावतीने निवेदन देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जमीन, पाणी व वीजेच्या मागण्या मान्य झाल्या नाहीत तर उद्योग भवनच्या दारात उग्र आंदोलन करण्याचा इशारा देखील सदर उद्योजकांनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार गोकुळ शिरगाव वसाहतीतील उद्योजकांच्या समस्या सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे खरे नाही.

दिनांक ११/१०/२०१७ रोजी गोकुळ शिरगाव मॅन्युफॅक्चर असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांच्या सोबत मुख्य अभियंता, महावितरण, कोल्हापूर यांनी गोकुळ शिरगांव औद्योगिक वसाहतीमधील वीजेच्या समस्याबाबत आढावा बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीत गोकुळ शिरगांव औद्योगिक वसाहतीमधील उपकेंद्र, उच्च दाब/लघुदाब विद्युत वाहिन्या, रोहित्रे यांची देखभाल व दुरुस्ती, योग्य दाबाने वीज पुरवठा करणे, डिस्ट्रीब्युशन बॉक्सेस बदलणे, पाणी पुरवठ्यासाठी अखंडीत वीज पुरवठा इत्यादी बाबत चर्चा झाली.

(२) हे खरे नाही.

(३) महावितरण कंपनीमार्फत गोकुळ शिरगाव औद्योगिक वसाहतीमध्ये देखभाल व दुरुस्तीची कामे जसे गोकुळ शिरगांव उपकेंद्राची क्षमता वाढविणे, एकूण ३० खराब झालेले डिस्ट्रीब्युशन बॉक्सेस बदलणे, झाडांच्या फांदया छाटणे, केबल, डी.ओ. फ्युज, ए.बी. स्वीचेस यांची दुरुस्ती, ५ ए.बी. स्विच बसवणे इत्यादी कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

चंद्रपूर जिल्ह्यात अवैधरित्या मद्याचा पुरवठा होत असल्याबाबत

(४३) * ३७०३२ श्री.मोहनराव कदम, श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे : सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ येथील स्टेट बँक चौकातून चंद्रपूर जिल्ह्यात मद्याचा पुरवठा होत असून त्यासाठी मुंबई व ठाणे येथील परिवहन कार्यालयाकडे नोंद असलेल्या आलीशान वाहनांचा वापर केला जात असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार अवैधरित्या मद्य जिल्ह्याबाहेर पाठविणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) नाही.

(२) यवतमाळ येथील स्टेट बँक चौकातून चंद्रपूर जिल्ह्यात मद्याचा पुरवठा होत असल्यासंदर्भात गुन्हे दाखल नाहीत. परंतू यवतमाळ जिल्ह्यातून चार चाकी वाहनाद्वारे अवैध दारु वाहतूकीसंदर्भात सन २०१६ मध्ये ४१ गुन्हे व सन २०१७ मध्ये ३६ गुन्ह्यांची नोंद दारुबंदी कायद्यांतर्गत झाली असून यापैकी सन २०१६ मध्ये ५ गुन्हे व सन २०१७ मध्ये १ गुन्हा मुंबई, ठाणे पासिंगच्या चार चाकी वाहनातून झाल्याची नोंद आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत नोकर भरतीत झालेल्या गैरव्यवहाराबाबत

(४४) * ३५२०६ डॉ.अपूर्व हिरे : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., या बँकेची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असणे, खातेदार, शेतकरी, शिक्षक, नोकरदार यांचे वैयक्तिक बँक खात्यात शिल्लक असूनही त्यांना पैसे न मिळणे तसेच बँकेच्या धनादेश क्लेअरिंगचा परवाना रद्द झाला असतांनाही बँकेने पुनः अनावश्यक बेकायदेशीर नोकर भरती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नोकर भरतीच्या चौकशीची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडे दिनांक ५ जून, २०१७ रोजीच्या पत्रान्वये केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बँकेने माहे जून, २०१६ मध्ये नियुक्त केलेले ४०० सेवक तसेच विद्यमान कर्मचाऱ्यांचे आर्थिक व्यवहार बंद असणे, पुरेसे काम नसणे तसेच नियुक्त कर्मचाऱ्यांचे वेतन प्रलंबित असताना पुनः अनावश्यक नोकर भरती करण्यात आल्याने सभासद खातेदारांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) अंशत: खरे आहे.

बँकेने सेवक उपसमिती सभा दिनांक ३०/१२/२०१६, ८ (३) अन्वये ८ सेवक व संचालक मंडळ सभा दिनांक १२/५/२०१७ ठराव क्र.२८ (३) अन्वये ८ सेवक अशाप्रकारे एकूण १६ सेवकांची रोजंदारीवर नेमणूक केली आहे.

(२) होय.

(३) बँकेत सद्य:स्थितीत निधीची कमतरता आहे. परंतु खातेदारांना त्यांचे गरजेनुसार प्रधान कार्यालयस्तरावर आर.टी.जी.एस. व्दारे पैसे उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ८३ अन्वये नियुक्त प्राधिकृत अधिकारी यांनी त्यांच्या अहवालात नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आर्थिक नुकसानीस बँकेच्या संचालक मंडळास

दोषी ठरविल्याने कलम-८८ अन्वये जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. त्यानुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अनुषंगिक नियम ७२(२) व ७२(३) नुसार नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सर्व संचालक व चौकशी अधिकारी यांची चौकशी सुरू आहे व चौकशीचे कामकाज न्यायिकत्व स्वरूपाचे आहे.

नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने रोजंदारीवर नियुक्त केलेल्या १६ सेवकांना बँकेच्या सेवेतून तात्काळ कमी करणेसंदर्भात विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९(१) अन्वये निर्देश दिले आहेत. यासंदर्भात पुनर्विचार होणेसंदर्भात बँकेतर्फे विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांचेकडे विनंती करण्यात आली. तथापि, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांनी बँकेची सदर विनंती अमान्य करून तात्काळ अंमलबजावणी करण्यास बँकेस कळविले आहे.

नाबार्डच्या सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाच्या निरीक्षण अहवालाच्या अनुषंगाने बँकेने आक्षेपांची पूर्तता केली नाही. सबब बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ११०-A (१)(III) अन्वये बँकेवर प्रशासकाची नियुक्ती करणेबाबतचा प्रस्ताव दिनांक १२/७/२०१७ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेकडे सादर केलेला असून अद्याप त्यांचेकडून मंजूरी देण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील वाल्मिकी समाजाच्या समस्यांबाबत

(४५) * ३५३११ प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वाल्मिकी समाजाच्या समस्या सोडविण्याचे आश्वासन मा.मुख्यमंत्री यांनी नागपूर येथे झालेल्या जाहीर कार्यक्रमामध्ये दिले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजकुमार बडोले : (१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील सहकारी संस्थांच्या लेखापरिक्षकांवर कारवाई करण्याबाबत

(४६) * ३५७८४ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.रामराव वडकुते, श्री.सुनिल तटकरे : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील सहकारी संस्थांनी आर्थिक वर्ष संपल्यानंतर संस्थांच्या लेखा परिक्षणाबाबतचा अहवाल दिनांक ३० ऑगस्ट पूर्वी सहकार विभागाला पाठविणे बंधनकारक असतांना मुंबईतील २१,००४ सहकारी संस्थांनी अद्यापही लेखापरिक्षण केलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१६-१७ मध्ये सहकार विभागाने नियुक्त केलेल्या १४०० लेखा परिक्षकांनी संबंधित सहकारी संस्थांचे लेखापरिक्षण न करण्याची कारणे काय आहेत तसेच याबाबत लेखापरिक्षकांना पाठविलेल्या नोटीसांचा संबंधितांकडून खुलासा प्राप्त झाला आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) हे अंशत: खरे आहे.

मुंबईमध्ये सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी पात्र असलेल्या १०७८१ संस्थांचे लेखापरिक्षण अद्याप पूर्ण झालेले नाही.

(२) व (३) लेखापरीक्षणाकरीता लेखापरीक्षक नामतालीकेवर मुंबईकरीता १६५२ इतके लेखापरीक्षक असून, सहकारी संस्थांनी त्यातूनच लेखापरीक्षकांच्या नियुक्त्या केल्या होत्या. लेखापरीक्षण पूर्ण न केलेल्या १०७८१ संस्थांना व संबंधित लेखापरीक्षकांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० कलम ७५ व कलम ८१ तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ नियम ६९ अन्वये नोटीस बजावण्यात आल्या होत्या. त्यावर प्राप्त झालेल्या खुलाशानुसार त्यांनी संस्थांचे दप्तर अपूर्ण असणे, लेखापरीक्षणास दप्तर उपलब्ध करुन न देणे, लेखापरिक्षकास सहकार्य न करणे, संस्थेचा पत्ता न सापडणे, संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची वारंवार चकरा मारुन भेट न होणे, संस्थेकडे रेकॉर्ड लिखाण कामासाठी कायम सेवकवर्ग नसणे, संस्थेस लेखापरिक्षण शुल्क अदा करण्यास पुरेसा निधी उपलब्ध नसणे, गृहनिर्माण संस्थांमध्ये लेखापरिक्षणाबाबतची जागरुकता नसणे, संस्था बंद व कार्यस्थगित असणे इत्यादी कारणे नमूद केलेली आहेत.

सदरच्या कारणांची सत्यता पडताळून दोषी लेखापरीक्षाकांवर नामतालीकेवरुन बडतर्फीची कारवाई केलेली आहे. तसेच ज्या संस्था लेखापरीक्षण करुन घेत नाहीत त्यांच्या संचालकांना संचालक मंडळावरुन कमी करण्याबाबत नोटीस देण्यात आलेल्या आहेत व अशा अनेक संस्था अवसायानात काढण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. तसेच फौजदारी कार्यवाहीबाबत देखील त्यांना नोटीस देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

शेतकऱ्यांना कर्जमाफीसाठी ऑनलाईन अर्ज करताना येत असलेल्या अडचणींबाबत

(४७) * ३४९३९ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.जयंत पाटील : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यासाठी सुरु करण्यात आलेली ई-सेवा केंद्रे बंद असणे तसेच इंटरनेटचा वेग व इतर अनेक अडचणींमुळे अनेक शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहिल्याचे दिनांक १३ आक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून विकसित करण्यात आलेल्या सॉफ्टवेअरमध्ये चुकीची माहिती तपासण्याची कोणतीच व्यवस्था नसणे त्यामुळे ई-सेवा केंद्रांमध्ये नोंदणीसाठी अनेक तांत्रिक अडचणी येणे, कर्जमाफीच्या ऑनलाईन अर्जाची छाननी न होणे व जिल्हास्तरावर पात्र-अपात्रतेचे निकष निश्चित करण्याची कोणतीही प्रक्रिया सुरु करण्यात आली नसल्याने शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची खोटी माहिती देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कर्जमाफी देताना ८९ लाख शेतकऱ्यांची आकडेवारी गृहीत धरण्यात आली होती, तर यासाठी गठीत केलेल्या समितीने कळविल्यानुसार खातेदारांची संख्या १३ लाख ३६ हजारांनी कमी झाली असून शासनाने जाहिर केलेल्या माहितीनुसार राज्यातील १० लाख शेतकऱ्यांची बँक खाती बनावट असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, लाभार्थी शेतकऱ्यांच्या संख्येत वरीलप्रमाणे विसंगती असण्याची कारणे काय आहेत, लाभार्थ्यांची निश्चित संख्या किती आहे, कर्जमाफीसाठी प्रत्यक्षात किती अर्ज सादर केलेले आहेत, त्यातील किती शेतकरी पात्र ठरविण्यात आलेले आहेत व त्यांना प्रत्यक्ष लाभ केव्हा देण्यात आला आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) नाही.

(२) नाही. मात्र छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ साठी शेतकऱ्यांनी ५६.५९ लाख ऑनलाईन अर्ज दाखल केले आहेत. सदर ऑनलाईन अर्जाची व संबंधित बँकांनी कर्जदार शेतकऱ्यांच्या कर्ज खात्याची भरलेली माहिती ऑनलाईन पध्दतीने प्रक्रिया (Process) करून पात्र लाभार्थींची यादी तयार होणार आहे. तसेच शासन निर्णय दिनांक २८/६/२०१७ मध्ये सदर योजनेसाठी अपात्र असणाऱ्या व्यक्तींचे निकष निश्चित करण्यात आले आहेत. त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) नाही.

(४) छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेंतर्गत कर्जमाफीसाठी शेतकऱ्यांनी ५६.५९ लाख ऑनलाईन अर्ज सादर केले आहेत. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व राष्ट्रीयकृत बँका यांना शासनाने दिनांक २७/११/२०१७ अखेर रक्कम रूपये ८६१०.६३ कोटी एवढी वितरीत केली असून त्यापैकी शेतकऱ्यांच्या ९.४३ लाख कर्ज खाती दिनांक ०५/१२/२०१७ पर्यंत रूपये ५१४२ कोटी एवढी रक्कम वर्ग करण्यात आली आहे. उर्वरीत रक्कम वर्ग करण्याचे काम सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद येथील कृषीपंप वीज जोडण्या प्रलंबित असल्याबाबत

(४८) * ३५३८० श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महावितरण परिमंडळात सन २०१० पासुन १०११४ कृषीपंप वीज जोडण्या प्रलंबित असून शेतकऱ्यांनी सन २०१० मध्ये कोटेशनच्या वीज रकमासह कागदपत्राची पुर्तता केली असतानाही त्यांना वीज जोडणी दिली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात पाण्याअभावी पिकांचे नुकसान होवू नये म्हणून १२ तास विद्युत पुरवठा करण्याचे शासनाने आदेश महावितरण कंपनीस देवून सुध्दा शेतीसाठी १२ तास विद्युत पुरवठा करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रलंबित जोडण्या देणे व गाव पातळीवर शेतीसाठी १२ तास विद्युत पुरवठा करणेबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) औरंगाबाद जिल्हयांतर्गत दिनांक ३१ मार्च, २०१० अखेर पैसे भरुन कृषीपंप वीज जोडणीकरिता अर्ज प्रलंबित असल्याचे आढळून येत नाही. परंतु औरंगाबाद परिमंडळांतर्गत सन २०१० पासून विविध योजनांच्या माध्यमातून अद्यापपर्यंत एकूण १,०३,११५ कृषीपंप वीज जोडण्या देण्यात आलेल्या आहेत.

(२) हे खरे आहे.

कोळश्याअभावी विजेची उपलब्धता कमी झाल्याने, मागणी व पुरवठा यामध्ये तफावत निर्माण होऊन भारनियमनाची स्थिती निर्माण झाली होती. वीज प्रणालीच्या सुरक्षिततेसाठी व तांत्रिक अडचणी निर्माण होऊ नये म्हणून कृषीपंपासाठी अतिरिक्त थ्री फेज वीज उपलब्ध करणे शक्य झाले नाही.

(३) औरंगाबाद परिमंडळांतर्गत औरंगाबाद व जालना जिल्हयातील पैसे भरुन प्रलंबित कृषीपंपाचे सन २०१५-१६ मध्ये विविध योजनेंतर्गत ११९२९ कृषीपंपाचे ऊर्जीकरण करण्यात आले. तसेच सन २०१६-१७ मध्ये ८०८२ कृषीपंपाचे ऊर्जीकरण करण्यात आले आहे. उर्वरित प्रलंबित कृषीपंपांना वीज जोडणी देण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नाफेड धान्य खरेदी केंद्रांकडून शेतकऱ्यांची अडवणूक होत असल्याबाबत

(४९) * ३४९०७ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने नाफेडमार्फत हमीभावाने मुग, उडीद, सोयाबीन व तूर खरेदी करण्यासाठी अनेक जिल्हयात शासकीय धान्य खरेदी केंद्र सुरु केली असून सदर केंद्रावर धान्य विक्री करताना शेतकऱ्यांना ऑनलाईन नोंदणी बंधनकारक करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय धान्य खरेदी केंद्रावर दररोज ५०० ते १००० शेतकऱ्यांच्या धान्याची आवक असताना सॉफ्टवेअरवर दिवसभरात केवळ २० ते २५ शेतकऱ्यांची नोंद होत असल्यामुळे अनेक शेतकरी धान्य विक्रीपासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ऑनलाईन नोंदणीसह सातबारा उतारा, आधार कार्ड, बँक पासबुक व हेक्टरी धान्य मर्यादा अशा अटींमुळे शेतकऱ्यांना अडचणी निर्माण होत असल्याने सदर जाचक अटी रद्द करून जास्तीत जास्त खरेदी केंद्र सुरु करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २३ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, धान्य खरेदी करताना शेतकऱ्यांना पूरक धोरण राबविणे तसेच ऑनलाईन नोंदणीसंदर्भातील जाचक अटी रद्द करण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) होय.

(२) खरे नाही.

(३) खरे आहे.

(४) ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया संक्षिप्त स्वरुपाची प्रक्रिया आहे. नोंदणीसाठीच्या अटी जाचक नसून त्यामुळे शेतकऱ्यांना खरेदी केंद्रावर माल आणणे सोयीचे झाले आहे आणि विक्री केलेल्या मालाची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करणे शक्य झाले आहे.

शेतकऱ्यांना नोंदणी करणे सोईचे व्हावे यासाठी आपले सरकारच्या माध्यमातून नोंदणी केंद्रे वाढविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. यांतर्गत प्रत्येक तालुक्यासाठी २-३ नोंदणी केंद्रे सुरु करणे प्रस्तावित आहे.

शेतकऱ्यांच्या मालाची जास्तीत जास्त खरेदी व्हावी यासाठी पुढीलप्रमाणे खरेदी केंद्रे सुरु केली आहेत :-

अ.क्र.	पिक	खरेदी केंद्रांची संख्या
१.	मूग	१०९
२.	उडीद	११२
३.	सोयाबीन	१५६

(५) प्रश्न उद्भवत नाही.

येवला (जि.नाशिक) येथे नाशिक प्रकल्पाचे व नांदगाव (जि.नाशिक) येथे कळवण प्रकल्पाचे उपकार्यालय निर्माण करण्याबाबत

(५०) * ३४६९७ श्री.जयवंतराव जाधव : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) येथे आदिवासी बांधवांच्या सोईसाठी आदिवासी विकास विभागाच्या नाशिक प्रकल्पाचे व नांदगाव (जि.नाशिक) येथे कळवण प्रकल्पाचे उपकार्यालय स्थापन करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.विष्णु सवरा : (१) होय, हे खरे आहे.

(२) येवला व नांदगाव (जि.नाशिक) या आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरच्या ठिकाणी आदिवासी प्रकल्प कार्यालयाचे उपकार्यालय स्थापन करण्याबाबत व्यवहार्यता तपासून पाहण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही

राज्यात राष्ट्रीय कुटुंब लाभ योजनेचा प्रसार करण्याबाबत

(५१) * ३५८५५ डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, आर्कि.अनंत गाडगीळ : सन्माननीय **सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाची राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना अयशस्वी झाल्याने या योजनेंतर्गत २ वर्षात ६५ कुटुंबांना केवळ रुपये २० हजारांचे अनुदान मिळाले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी सर्वोच्च न्यायालयाने ग्रामपंचायत, स्वस्त धान्य दुकाने व शाळांमध्ये माहिती पत्रके लावणे तसेच कुटुंबातील प्रमुख व्यक्तीचा मृत्यू झाल्याने लाभार्थी कागदपत्रांची पूर्तता करु शकत नसल्यास ग्रामसेवक, तलाठी व सरपंच यांनी संबंधित व्यक्तींचा अर्ज भरुन घेण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानूसार सदर योजनेच्या प्रसारासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री.राजकुमार बडोले : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) या योजनेंतर्गत अर्थसहाय्यासाठी पात्र होऊ शकणाऱ्या लाभार्थी कुटुंबांना तहसिल कार्यालय व संबंधित तलाठी यांच्यामार्फत वेळोवेळी मार्गदर्शन केले जाते. योजनेच्या माहितीबाबतचे बॅनर्स ग्रामपंचायत, तलाठी कार्यालय तसेच तहसिल कार्यालयात लावले जातात. तलाठी यांनी प्रत्येक लाभार्थ्यांचा अर्ज स्वत: भरुन घेऊन कार्यालयात दाखल करण्याबाबत वेळोवेळी सर्व तलाठी यांना तहसिलदार यांच्यामार्फत निर्देश देण्यात येतात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

परळी औष्णिक विद्‌युत केंद्रातील वीज निर्मिती बंद असल्याबाबत

(५२) * ३५५१० श्री.धनंजय मुंडे : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळी औष्णिक विद्‌युत केंद्रातील संच क्रमांक ३ ते ८ मार्फत होणारी वीज निर्मिती बंद असल्याचे माहे ऑक्टोंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाण्याची उपलब्धता असतांनाही या केंद्रातील वीज निर्मिती बंद ठेवल्याने परिसरातील प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगारावरही परिणाम झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परळी औष्णिक विद्युत केंद्रातील सर्व संच पुर्ववत सुरू ठेवुन वीज निर्मिती करण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) अंशत: खरे आहे,

(अ) परळी औष्णिक विद्युत केंद्रातील संच क्रमांक ३, दिनांक ०१/०४/२०१६ पासून आयुर्मान संपल्यामुळे कायमस्वरुपी बंद करण्यात आला आहे.

(ब) परळी संच क्र. ४ व ५ महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या निर्देशानुसार "रिझर्व शटडाऊन" अंतर्गत बंद आहेत.

(क) माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये परळी संच क्रमांक ६ दिनांक १४/१०/२०१७ पर्यंत कार्यरत होता. तथापि, सदर संच दिनांक १४/१०/२०१७ ते १४/११/२०१७ पर्यंत मेरीट ऑर्डर डिस्पॅच (व्हेरिएबल कॉस्ट) तत्वानुसार बंद ठेवण्यात आला होता.

(ख) परळी संच क्र. ७ दिनांक ११/१०/२०१७ पर्यंत कार्यरत होता. तथापि, सदर संच दिनांक १२/१०/२०१७ ते १३/११/२०१७ पर्यंत मेरीट ऑर्डर डिस्पॅच (व्हेरिएबल कॉस्ट) तत्वानुसार बंद ठेवण्यात आला होता. त्यानंतर सदर संच दिनांक १३/११/२०१७ रोजी सुरु करण्यात आला.

(ड) संच क्रमांक ८ हा दिनांक ०३/१०/२०१७ ते १३/१०/२०१७ हया काळात कोळशाच्या कमरतेमुळे बंद ठेवण्यात आला होता. कोळश्याची उपलब्धता झाल्यानंतर सदर संच दिनांक १४/१०/२०१७ रोजी सुरु करण्यात आला होता. त्यानंतर सदर संच दिनांक १८/१०/२०१७ ते २३/१०/२०१७ पर्यंत मेरीट ऑर्डर डिस्पॅच (व्हेरिएबल कॉस्ट) तत्वानुसार बंद ठेवण्यात आला होता. सदर संच दिनांक २३/१०/२०१७ पासून सुरु ठेवण्यात आला आहे.

(२) परळी संच क्रमांक ६, ७ व ८ कमी कालावधीकरिता बंद ठेवण्यात आले असल्यामुळे परळी परिसरातील रोजगारावर परिणाम झालेला दिसून येत नाही.

(३) परळी औष्णिक विद्युत केंद्रातील संच क्र. ४ ते ८ वीज निर्मितीसाठी उपलब्ध असून "रिझर्व शटडाऊन" व "एम.ओ.डी." प्रणालीनुसार संचाचे संचलन करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सहकार विभाग व बँका यांच्याकडील कर्जदार शेतकऱ्यांच्या अर्जामधील संख्येत तफावत असल्याबाबत

(५३) * ३४७१५ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने जाहिर केलेल्या पीककर्ज माफीसाठी मुदती अखेर म्हणजेच दिनांक २२ सप्टेंबर, २०१७ रोजीपर्यंत ५७ लाख ६८ हजार अर्ज प्राप्त झाल्याची माहिती शासनाच्या सहकार विभागातून जाहिर करण्यात आली असून बँकांकडील माहितीनुसार ८९ लाख कर्जदार शेतकऱ्यांचे अर्ज दाखल झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहकार विभाग व बँका यांच्याकडे कर्जदार शेतकऱ्यांच्या अर्जामधील संख्येत तफावत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तफावतीबाबत बँका व संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी होऊन बोगस कर्जदार शेतकऱ्यांची आकडेवारी जाहिर करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) नाही, छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेसाठी शेतकऱ्यांनी ५६.५९ लाख ऑनलाईन अर्ज सादर केले आहेत.

(२), (३) व (४) सदर माहिती घेणे सुरू आहे. कर्जमाफीची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर, अंतिम आकडेवारी पुढे येईल. त्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

राज्यात महात्मा जोतिराव फुले, सावित्रीबाई फुले व राजर्षी शाहू महाराज या महापुरुषांची छायाचित्रे उपलब्ध होत नसल्याबाबत

(५४) * ३५९७७ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सामाजिक सुधारणेचा विचार आणि कार्याद्वारे देशाला विकासाची दिशा देणाऱ्या महात्मा जोतिराव फुले, सावित्रीबाई फुले व राजर्षी शाहू महाराज या महापुरुषांची छायाचित्रे शासकीय मुद्रणालयात उपलब्ध नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाहू महाराजांचे छायाचित्र छापण्याबाबत कोल्हापूरच्या मुद्रणालयाकडून मागील दोन वर्षापासून मुंबईतील कार्यालयाकडे अनेकदा दुरध्वनी व पत्राद्वारे मागणी होत असूनही छायाचित्रे उपलब्ध होत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन छायाचित्रे छापण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देसाई : (१) राज्यात सामाजिक सुधारणेचा विचार आणि कार्याद्वारे देशाला विकासाची दिशा देणाऱ्या सावित्रीबाई फुले व राजर्षी शाहू महाराज या दोन महापुरुषांची रंगीत छायाचित्रे शासकीय ग्रंथागार मुंबई येथे विक्रीकरिता उपलब्ध आहेत. व इतर सर्व शासकीय ग्रंथागारांना व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई येथून वितरणाची कार्यवाही सुरु आहे.

(२) शाहू महाराजांचे छायाचित्र कोल्हापूर ग्रंथागार ऐवजी शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई येथे छापून मुंबई ग्रंथागारात उपलब्ध करण्यात आले असून इतर ग्रंथागारांना वितरणाची कार्यवाही सुरु केली आहे.

(३) व (४) महात्मा जोतिराव फुले यांचे रंगीत छायाचित्र मान्यतेसाठी सामान्य प्रशासन विभागास पाठविण्यात आलेले असून मान्यता प्राप्त होताच तात्काळ मुद्रण करुन सर्व शासकीय ग्रंथागारांना विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्यात येईल.

डोंबिवली (जि.ठाणे) औद्योगिक परिसरात दुर्गंधी पसरल्याबाबत

(५५) * ३४९९३ श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.रविंद्र फाटक : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (जि.ठाणे) औद्योगिक परिसरातील सन १९६३ साली टाकण्यात आलेल्या रसायन मिश्रित पाणी वाहून नेणाऱ्या वाहिन्या फुटून सांडपाणी डोंबिवली पूर्व येथील स्टार कॉलनी महामार्गाला जोडणाऱ्या रस्त्यावर वाहत असल्याने दुर्गंधी पसरुन नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून या वाहिन्या वारंवार नादुरुस्त होत असल्याने त्यांची कायमस्वरुपी दुरुस्तीबाबत महामंडळाने लक्ष घालावे यासाठी नोटीसही देण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन जीर्ण वाहिन्या दुरुस्त करणे तसेच यास जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत, ?

श्री.सुभाष देसाई : (१) हे अंशत: खरे आहे.

डोंबिवली पुर्व येथील स्टार कॉलनी महामार्गाला जोडणाऱ्या रस्त्यावर सांडपाणी वाहण्याची घटना दिनांक ०९/१०/२०१७ रोजी निदर्शनास आली आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे अधिकारी व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी यांचेकडून संयुक्त पाहणी दरम्यान सांडपाणी वाहिनी दोन चेंबर दरम्यान तुंबल्यामुळे ओव्हरप्लो होऊन रस्त्यावर आल्याचे आढळून आले. सदर तुंबलेले सांडपाणी वाहिनी त्वरीत स्वच्छ करण्यात आली व ओव्हरप्लो थांबविण्यात आला आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने दिनांक ०९/१०/२०१७ च्या पत्राद्वारे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास निर्देश दिलेले आहेत.

(३) व (४) सदर ठिकाणी सांडपाणी वाहिनीवरील चेंबर पुन्हा ओव्हरप्लो झालेले नाही. सांडपाणी वाहिनी व त्यावरील चेंबर यांचे दैनंदिन देखभाल व दुरुस्ती त्वरीत करण्यात येते.

राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची यादी उपलब्ध करुन देण्याबाबत

(५६) * ३५८७७ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सन २००७-२००८ मध्ये दीड लाख शेतकऱ्यांचे रुपये २८७ कोटींचे कर्ज माफ करुन तो निधी बँकांना देण्यात येऊनही ८ लाख ४० हजार शेतकऱ्यांच्या बँक खात्यात निधी जमा झाला नसल्याने कर्जमाफी दिलेल्या शेतकऱ्यांची यादी शासनाकडे देण्याचे निर्देश मा.सहकार मंत्री यांनी सहकार आयुक्तांमार्फत संबंधित बँकांना दिले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहकार आयुक्तांच्या दिलेल्या निर्देशानूसार मुंबईतील बँकांनी केवळ ३५० शेतकऱ्यांची यादी सहकार आयुक्तांना पाठविली असल्याने याबाबत चौकशी करुन कर्जमाफी दिलेल्या शेतकऱ्यांची संपूर्ण यादी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

आकाशवाणी, हडपसर (जि.पुणे) येथील वसतिगृहाच्या दुरवस्थेबाबत

(५७) * ३५२५३ श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आकाशवाणी, हडपसर (पुणे) येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या वसतिगृहात निकृष्ट आहार देणे तसेच स्वच्छतागृहांच्या अपुऱ्या संख्येमुळे अस्वच्छता निर्माण झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.विष्णु सवरा : (१) आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, हडपसर येथील विद्यार्थ्यांनी दिनांक ०७/१०/२०१७ रोजी भोजनामध्ये दोन्ही वेळेस बटाटा मिक्स भाजी दिल्यामुळे विद्यार्थ्यांनी जेवण न घेतल्याची बाब निदर्शनास आलेली आहे.

(२) सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात सदर वसतिगृहात ११५ विद्यार्थी प्रवेशित असून सदर वसतिगृहातील विद्यार्थ्यांना शासन निर्णयात नमूद अटी व शर्तींनुसार भोजन देण्याबाबत भोजनठेकेदारास सक्त सूचना देण्यात आल्या आहेत. पिण्याच्या पाण्यासाठी आर.ओ.फिल्टर, वॉटर कुलर उपलब्ध असून वापरासाठी महानगरपालिका तसेच बोअरवेलचे मुबलक पाणी उपलब्ध आहे. सदर वसतिगृह भाड्याच्या इमारतीत कार्यरत असून यामध्ये ६ शौचालये व ६ स्नानगृहे तसेच ८ सामाईक स्नानगृहे व शौचालये आहेत. वसतिगृह स्वच्छतेसाठी नियमित सफाई कामगार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक जिल्हयातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत

(५८) * ३४९७२ ॲड.जयदेव गायकवाड : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील शेतकऱ्यांनी चालू वर्षी कांदा पिकासाठी रुपये ४४३१ कोटी भांडवली खर्च केला असून त्यांना वर्षभरात कांदा विक्रीतून केवळ रुपये २५०० कोटी मिळाल्याने शेतकऱ्यांचे अंदाजे रुपये २००० कोटीचे नुकसान झाल्याचे कृषी व पणन विभागाच्या आकडेवारीवरुन निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन कांदा उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) व (२) नाही.

मागील वर्षाच्या तुलनेत नाशिक जिल्ह्यातील कांद्याची आवक व मिळालेली किंमत पहाता चालू वर्षात एप्रिल ते ऑक्टोबर, २०१७ या महिन्यात सरासरी रुपये ९८२/- प्रति क्विंटल दर शेतकऱ्यांना मिळालेला आहे. तर मागील वर्षात सरासरी दर रुपये ६५९/- प्रति क्विंटल होता.

कांदा उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या मालासाठी योग्य भाव मिळावा यादृष्टीने देशातील इतर राज्यात कांदा पाठविणे सुलभ व्हावे, यासाठी रेल्वेचे जादा वॅगन व रॅक्स उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. तसेच FPO मार्फत पंजाब, हरियाणा व दिल्ली या ठिकाणी कांदा विक्रीच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. त्याचबरोबर नाफेडच्यावतीने बिहार व पं.बंगालमध्ये कांदा विक्रीसाठी सुविधा उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

शासकीय अनुदानित केंद्रीय आश्रमशाळा व एकलव्य निवासी शाळांमधील शिक्षकांच्या नियुक्तीबाबत

(५९) * ३५६९२ आर्कि.अनंत गाडगीळ : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी विकास विभागाच्या नियंत्रणाखालील शासकीय अनुदानित केंद्रीय आश्रमशाळा व एकलव्य निवासी शाळांमध्ये शिक्षक पात्रता परिक्षा उत्तीर्ण नसलेल्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदरहू शिक्षकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.विष्णु सवरा : (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील पदवी, वैद्यकीय व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयातील अनुसूचित जाती/जमातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याबाबत

(६०) * ३६०२१ श्री.बाळाराम पाटील, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध पदवी, वैद्यकीय व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयातील अनुसूचित जाती/जमातीच्या विद्यार्थ्यांना मागील दोन वर्षापासून शिष्यवृत्तीची रक्कम अदा करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात ३० टक्के शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांना दिली नसल्याने नागपूर विभागात रुपये १५० कोटी शिष्यवृत्तीची रक्कम थकीत असून शैक्षणिक धोरणामुळे आणि पदभरतीवरील निर्बंधामुळे महाविद्यालयातील प्राध्यापकांची संख्या कमी झाली असल्याने विद्यार्थी आणि प्राध्यापक परीक्षांवर बहिष्कार टाकणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन थकीत शिष्यवृत्तीची रक्कम देणे व प्राध्यापक पद भरतीवरील निर्बंध उठविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजकुमार बडोले : (१) अनुसूचित जातीच्या पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अदा करण्यात आलेली आहे.

(२) सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात नागपूर विभागात रुपये १५० कोटी शिष्यवृत्तीची रक्कम थकीत असल्याची बाब खरी नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

केंद्र शासनाकडून देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीत गैरव्यवहार झाल्याबाबत

(६१) * ३४९३२ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्रीमती हुस्नबानू खलिफे : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाकडून उच्च शिक्षणासाठी देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीमध्ये कोटयवधींच्या झालेल्या गैरव्यवहाराबाबत राज्यातील २६ हजार वाणिज्य, विज्ञान, कला, समविज्ञान, मेडिकल, इंजिनिअरिंग व पॉलिटेक्नीक विद्यालयांवर शासनाकडून कारवाई होत नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गैरव्यवहाराची चौकशी करणाऱ्या विशेष तपास पथकाच्या (एसआयटी) अहवालानुसार गैरव्यवहार करणाऱ्या विद्यालयांचे परवाने रद्द करुन त्यांच्यावर फौजदारी कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजकुमार बडोले : (१) हे खरे नाही.

(२) नाही, विशेष चौकशी पथकाच्या अहवालानुसार अनियमितता गैरव्यवहार प्रकरणी दोषी शैक्षणिक संस्थाविरुध्द फौजदारी व वसुलपात्र रक्कमेच्या वसूलीची कार्यवाही करण्याबाबत आयुक्त, समाजकल्याण यांच्यामार्फत संबंधित जिल्ह्यांच्या सहायक आयुक्त, समाजकल्याण यांना कळविण्यात आले आहे. तथापि, संबंधित संस्थांनी दाखल केलेल्या रिट याचिकांवर मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद व नागपूर खंडपिठाने दिलेल्या स्थगिती आदेशानुसार संबंधित संस्थांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आलेले नाहीत. मात्र, शैक्षणिक संस्थाकडून वसुलपात्र रक्कमेच्या वसुलीची कार्यवाही संबंधित सहायक आयुक्त, समाजकल्याण यांच्यामार्फत सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळण्याबाबत

(६२) * ३५७१५ श्री.जयंत पाटील : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.मुख्यमंत्री यांनी छत्रपती शिवाजी महाराज सन्मान योजनेंतर्गत शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची अंमलबजावणी सुरु केली असून या कर्जमाफीसाठी रायगड जिल्ह्यातील किती शेतकऱ्यांची माहिती ऑनलाईनद्वारे शासनास प्राप्त झाली आहे तसेच कर्जमाफीसाठी आवश्यक असणारी माहिती शासनाने दिलेल्या मुदतीनुसार दिनांक १४ ऑक्टोबर, २०१७ रोजीपर्यंत शेतकऱ्यांकडून उपलब्ध न झाल्यामुळे राष्ट्रीयकृत आणि खाजगी बँकांकडून कर्ज घेतलेले किती शेतकरी या योजनेपासून वंचित राहिले आहेत,

(२) असल्यास, जिल्ह्यातील राष्ट्रीयकृत आणि खाजगी बँकांकडून किती शेतकऱ्यांना कर्ज वाटप करण्यात आले आहे, त्यापैकी किती शेतकऱ्यांना राष्ट्रीयकृत आणि खाजगी बँकांकडून सोनेतारण कर्जांतर्गत शेतीसाठी कर्ज वाटप करण्यात आले आहे,

(३) असल्यास, उक्त माहितीनुसार जिल्ह्यातील नियमित कर्जफेड करीत असलेले व थकीत कर्जदार असलेल्या किती शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळाला आहे ?

श्री.सुभाष देशमुख : (१) रायगड जिल्ह्यामध्ये

i) रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक	-	१६६२९
ii) राष्ट्रीयकृत बँका	-	१३४१७

असे शेतकऱ्यांच्या एकूण ३००४६ अर्ज ऑनलाईन प्रणालीद्वारे शासनास प्राप्त झाले आहेत.

(२) रायगड जिल्ह्यामध्ये राष्ट्रीयकृत व खाजगी बँकांकडून १३४१७ शेतकरी सभासदांना कर्ज वाटप केले असून, या बँकांमार्फत ११३७ सभासदांना सोनेतारण कर्ज अंतर्गत शेतीसाठी कर्ज वाटप करण्यात आले आहे.

(३) रायगड जिल्ह्यात दिनांक २८/११/२०१७ अखेर थकीत असलेल्या ९० शेतकऱ्यांना रुपये ५१.३७ लाख रक्कमेचा कर्जमाफीचा लाभ मिळाला आहे.

राज्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती व मानधनात वाढ करण्याबाबत

(६३) * ३६९२८ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील : सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिव्यांग विद्यार्थ्यांच्या अपंग शिष्यवृत्ती व मानधनाची परिगणना सन १९९५ मध्ये करण्यात आलेली असल्याने वाढीव महागाईनुसार सदर शिष्यवृत्ती व मानधनात वाढ करण्याची मागणी संबंधितांकडून केली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर शिष्यवृत्ती व मानधनात वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजकुमार बडोले : (१) व (२) राज्यामध्ये शालांतपूर्व व शालांत परिक्षोत्तर शिक्षण घेणाऱ्या अपंग विद्यार्थ्यांना यापुर्वी दिनांक १५/११/२००३ रोजीच्या शासन निर्णयांमध्ये नमूद दरानुसार शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येत होती. शासन निर्णय दिनांक ३०/०८/२०१४ अन्वये अपंग विदयार्थ्यांच्या शिष्यवृत्ती दरामध्ये वाढ करण्यात आली असून सद्य:स्थितीत सदर दरानुसार अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अदा करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

नानीवली (ता.डहाणू, जि.पालघर) येथील शासकीय आश्रमशाळेतील अधिक्षकांनी विद्यार्थ्यांला मारहाण केल्याबाबत

(६४) * ३५३२० श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नानीवली (ता.डहाणू, जि.पालघर) येथील शासकीय आश्रमशाळेतील अधिक्षक, नामदेव मुंडे यांनी दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास दारुच्या नशेत इयत्ता नववीत शिकणाऱ्या एका आदिवासी विद्यार्थ्यांला बेशुध्द होईपर्यंत मारहाण केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अधिक्षकाने यापूर्वीही आकोली, किराट, बोरशेती येथील आश्रमशाळेतील मुलांना जबर मारहाण केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व तद्नुसार संबंधित दोषी अधिक्षकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.विष्णु सवरा : (१) व (२) नानीवली (ता.डहाणू, जि.पालघर) येथील शासकीय आश्रमशाळेतील श्री.नामदेव मुंडे, प्राथमिक शिक्षक तथा प्रभारी अधिक्षक यांनी सदर आश्रमशाळेतील विद्यार्थी कु.निलेश मधुकर मातेरा या विद्यार्थ्यास अरेरावी व उध्दट वर्तन केल्याच्या कारणास्तव मारहाण केली होती.
(३) प्रस्तुत प्रकरणी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, ता.डहाणू, जि.पालघर यांचेस्तरावरुन चौकशी समितीची स्थापना करण्यात येऊन सदरहू प्रकरणाची चौकशी करण्यात आली. सदर चौकशीत श्री.नामदेव मुंडे, प्राथमिक शिक्षक तथा अधिक्षक हे दोषी आढळून आल्याने त्यांना "एक वेतनवाढ भावी वेतनवाढीवर परिणाम होणार नाही अशाप्रकारे एक वर्षाकरीता रोखून ठेवण्यात यावी" अशी शिक्षा देण्यांत आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील दुर्बल घटकांच्या अनुदानात वाढ करण्याबाबत

(६५) * ३४९०० श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३११२१ ला दिनांक १० ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात श्रावणबाळ, वयोवृध्द, संजय गांधी निराधार, अपंग, विधवा आणि शारिरीक व मानसिक आजाराने त्रस्त व्यक्तिंना शासनाच्या विविध योजनांतर्गत प्रत्येकी दरमहा देण्यात येत असलेली रक्कम ही सध्याच्या महागाईच्यादृष्टीने तुटपुंजी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी दुर्बल घटकांना दिल्या जाणाऱ्या अनुदानाच्या रक्कमेत वाढ करणे तसेच यासाठी निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजकुमार बडोले : (१) व (२) राज्यात निराधार, अपंग, विधवा, इ.व्यक्तिंकरिता राबविण्यात येणारी संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेच्या लाभार्थ्यांच्या अनुदानात वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर मेडीकल रोडवरील (नागपूर) देशी दारूचे दुकान बंद करण्याबाबत

(६६) * ३५४२७ श्री.गिरीशचंद्र व्यास : सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील नागपूर मेडीकल रोड, कुंदनलाल वाचनालय जवळील नागव्दार मंदिराला लागून असलेले देशी दारूचे बंद दुकान सुरू करण्यात आल्याने परिसरातील महिलांनी सदर दारूचे दुकान पुन्हा बंद करण्याची मागणी दिनांक २९ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) अंशतः खरे आहे.
(२) होय. याप्रकरणी चौकशी करण्यात आली असून केलेल्या चौकशीत सदर अनुज्ञप्ती नियमानुसार सुरु असल्याचे दिसून आले. नियमानुसार सुरु असलेली किंवा स्थलांतर झालेली अनुज्ञप्ती बंद करावयाची असल्यास शासन

अधिसूचना, दिनांक २५ मार्च, २००८ आणि दिनांक १२ फेब्रुवारी, २००९ मध्ये विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार दारुबंदी करणेसाठी निवेदन सादर करण्याबाबत तक्रारकर्त्यास अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, नागपूर यांच्या दिनांक ३/१०/२०१७ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

चिखली (ता.पनवेल, जि.रायगड) येथील आश्रमशाळेची दुरुस्ती करण्याबाबत

(६७) * ३५२२७ श्री.रविंद्र फाटक, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अनिल भोसले : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली (ता.पनवेल, जि.रायगड) गावातील अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेत मध्यरात्री विद्यार्थी झोपेत असतानाच स्लॅब कोसळण्याची घटना माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घडल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू आश्रमशाळेची दुरुस्ती करण्याबाबतचे पत्र शाळेच्या व्यवस्थापनाने यापूर्वीच सार्वजनिक बांधकाम विभागाला दिले असतांनाही विभागाने याकडे दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आश्रमशाळेची दुरूस्ती करण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करून आश्रमशाळेची दुरूस्ती करण्याबाबत तसेच जखमी विद्यार्थ्यांवर उपचार करुन त्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.विष्णु सवरा : (१) होय, हे खरे आहे. प्रकल्प कार्यालय पेण अंतर्गत अनुदानित आश्रमशाळा, चिखले, ता.पनवेल, जि.रायगड येथे इमारतीच्या स्लॅबचे प्लॅस्टर कोसळून ८ विद्यार्थी जखमी झाल्याची घटना घडलेली आहे.

(२) व (३) सदरची आश्रमशाळा ही दी इन्टिट्युट ऑफ कल्चरल अफेअर्स इंडिया, पनवेल, जि. रायगड या खाजगी संस्थेची आहे. त्यामुळे आश्रमशाळेच्या इमारतीची दुरुस्तीबाबत संबंधित संस्थेने सार्वजनिक बांधकाम विभागास पत्र देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

स्लॅबचे प्लॅस्टर कोसळण्याच्या अपघातात एकूण ८ विद्यार्थी जखमी झाले होते. त्यापैकी ४ विद्यार्थी किरकोळ जखमी झाले होते. जखमी विद्यार्थ्यांवर वेळीच वैद्यकिय उपचार करण्यात आले असून जखमी विद्यार्थ्यांच्या प्रकृतीत सुधारणा झाली असून ते त्याच आश्रमशाळेत शिकत आहेत. विद्यार्थ्यांच्या वैद्यकिय उपचारावरील खर्चाची पूर्तता संबंधित संस्थेने केलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नांदेड शहरास नियमित वीज पुरवठा करण्याबाबत

(६८) * ३५५९३ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड शहरातील औद्योगिक प्रशिक्षण संस्था व इतर भागात महावितरणकडून कोणतीही पूर्वसूचना न देता वीज पुरवठा खंडीत करण्यात येत असल्यामुळे येथील नागरिक त्रस्त झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने संबंधित अधिकाऱ्यांना योग्य समज देवून येथील वीज पुरवठा सुरळीत ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) माहे सप्टेंबर, २०१७ च्या सुरुवातीस वीज निर्मिती केंद्राना कोळशाच्या उपलब्धतेत व पुरवठयामध्ये अडचणी येत असल्यामुळे विजेची उपलब्धता कमी झाली व त्यामुळे दिनांक ०९/०९/२०१७ ते दिनांक ०७/१०/२०१७ पर्यंत, मा.वीज नियामक आयोगाने दिलेल्या निकषानुसार राज्यात गरज भासेल तेव्हा काही दिवसांकरिता तात्पुरत्या स्वरुपाचे भारनियमन करण्यात आले होते. हे भारनियमन कमी वसुली व जास्त वीज हानी असलेल्या गटातील वाहिन्यांवर गरजेनुसार केले जात होते.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुर्री (जि.गोंदिया) येथील शासकीय निवासी शाळा व वसतिगृहात सोई सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

(६९) * ३५९०७ श्री.परिणय फुके : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुर्री (जि.गोंदिया) या दुर्गम भागातील आदिवासी व अनुसूचित जातीच्या गरीब विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे म्हणून कोटयवधी रुपये खर्चून शासनाने शासकीय निवासी शाळा व वसतिगृह सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शाळेच्या इमारतीच्या खिडक्यांना काचा नसणे, पडदे नसणे, वीज पुरवठा नसल्याने खोल्यातील पंखे केवळ नावापूरतेच असणे तसेच विद्यार्थांना देण्यात येणाऱ्या जेवणाचा दर्जा देखील निकृष्ठप्रतीचा असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी विद्यार्थी व स्थानिक नागरीकांनी संबंधितांकडे अनेक वेळा तक्रार करुनही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजकुमार बडोले : (१) होय

(२), (३), (४) नंगपुरा/मुर्री, जिल्हा गोंदिया येथील निवासी शाळेसाठी सुसज्ज इमारत उपलब्ध असुन विद्यार्थ्यांना सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत

दिनांक २/९/२०१७ रोजी या इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर शॉर्ट सर्कीट झाल्याने त्या मजल्यावरील विद्युत पुरवठा खंडित झाला होता. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सदर वीज पुरवठा सुरळीत करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

यवतमाळ शहरात अनधिकृतपणे विजेचा वापर होत असल्याबाबत

(७०) * ३४८७५ श्री.हरिसिंग राठोड : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ शहरातील अमृत योजनेचे बांधकाम तसेच इतर अनेक कामांसाठी विजेचा अनधिकृतपणे वापर होत असून शहरात आठ ते नऊ टक्केच काम झाले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, वीज वितरण कंपनीचे संबंधित अधिकारी व कंत्राटदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) यवतमाळ शहरात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत अमृत योजनेंतर्गत एकूण १९ प्रस्तावित पाण्याच्या टाक्यांपैकी एका पाण्याच्या टाकीच्या बांधकामांसाठी विजेचा अनधिकृतपणे वापर होत असल्याचे निदर्शनास आले होते.

(२) अमृत योजनेंतर्गत पाण्याच्या टाकीच्या बांधकामासाठी पाण्याच्या मोटरकरिता अनधिकृत वीज वापर करणारे कंत्राटदार श्री.श्रीकृष्ण गोवारे यांचेविरुध्द विद्युत कायदा २००३ च्या कलम १३५ अन्वये कार्यवाही करुन दंड व वीज आकार एकूण रुपये २,९६० व तडजोड रक्कमेपोटी एकूण रुपये ५,०००/- आकारणी करण्यात आली असून ग्राहकाने सदर रक्कमेचा भरणा दिनांक ९/१०/२०१७ रोजी केलेला आहे व श्री.प्रमोद श्रीहरी कोंडे यांनी त्यांच्या घरगुती कनेक्शनवरुन बांधकामाकरिता अनधिकृत वीज जोडणी केल्याच्या प्रकरणी यांचेविरुध्द विद्युत कायदा २००३ च्या कलम १२६ अन्वये कार्यवाही करुन दंडाची रक्कम व अनधिकृत वीज वापराचे रक्कमेपोटी एकूण रुपये ७,५२०/- ची आकारणी माहे ऑक्टोबर, २०१७ च्या वीज देयकात करण्यात आली आहे. सदर ग्राहकाने रक्कम रुपये ७,५२०/- चा भरणा दिनांक २८/११/२०१७ रोजी केलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

भोसे (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) येथील शेतकऱ्यांच्या वीज देयकांची आकारणी रद्द करण्याबाबत

(७१) * ३५५१२ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.शरद रणपिसे : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोसे (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) येथे सलग ८ व्या वर्षीही कमी पाऊस झाल्याने व तलावात पाणी नसल्याने शेतकऱ्यांनी तलावाच्या पाण्याचा वापर केला नसतांना वीज वितरण कंपनीने येथील शेतकऱ्यांकडून जादा वीज देयकांची आकारणी केल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन येथील शेतकऱ्यांना ८ वर्षाच्या वीज देयकांची आकारणी रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) भौसे (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) येथील तलावावर असलेल्या १२ शेतीपंप ग्राहकांना जादा वीज देयकांची आकारणी करण्यात आली होती.

(२) व (३) स्थळ पाहणी करुन चुकीची वीज देयके महावितरण कंपनीकडून दुरुस्त करण्यात आली आहेत.

विद्युत क्षेत्र, अकोला येथील महावितरण सर्कल संघटनेच्या मागण्यांबाबत

(७२) * ३५५९९ श्री.गोपिकिशन बाजोरीया : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियन महावितरण सर्कल संघटनेने महावितरण कंपनीतील विद्युत अपघात टाळण्यासाठी जुन्या लघु व उच्च दाब वाहिनी, पोल व स्ट्रक्चर दुरुस्ती करण्यासंदर्भात दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ रोजी विभागीय कार्यालयासमोर तसेच दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास महावितरणच्या सर्व मंडळ कार्यालयासमोर धरणे आंदोलने व निदर्शने केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संघटनांनी उपरोक्त प्रमुख मागण्यांचे निवेदन अकोला महावितरण कंपनीचे प्रमुख यांच्याकडे सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, संघटनेच्या मागणीच्या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) जुन्या वाहिन्यांची दुरुस्ती जसे की वाकलेले/सडलेले लोखंडी विद्युत पोल/स्ट्रक्चर, जुन्या लघु व उच्चदाब वाहिनीच्या लोंबकळलेल्या तारा इ. मेंटेंनन्सची कामे करण्याकरीता अकोला/वाशिम/बुलढाणा मंडळस्तरावर उपविभागनिहाय निविदा काढून कंत्राटदारामार्फत देखभाल दुरुस्तीची कामे नियमितपणे करण्यात येतात. त्याचप्रमाणे अकोला मंडळांतर्गत सन २०१६-१७ पासून १९२९ वाकलेले विद्युत पोल सरळ करण्यात आलेले आहेत. ४९९ सडलेले लोखंडी विद्युत पोल बदलविण्यात आलेले आहेत व २९२५ गाळ्यातील लोंबकळलेल्या तारा सुव्यवस्थित करण्यात आलेल्या आहेत. तसेच शहरी भागात व औद्योगिक वसाहत (MIDC) भागात शिडीगाडी देण्यात आलेली असून आवश्यक सुरक्षा साधनेसुध्दा पुरविण्यात येतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत गैरव्यवहार झाल्याबाबत

(७३) * ३५३८५ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता असूनही आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणासाठी परदेशी संस्थांमध्ये प्रवेश घेऊ न शकलेल्या विद्यार्थ्यांसाठी शासनाने दिनांक ११ जून, २००३ रोजी वा त्यासुमारास परदेश शिष्यवृत्ती योजना लागू केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदर शिष्यवृत्तीसाठी जाहिर केलेल्या पात्र विद्यार्थ्यांच्या यादीमधील मा.सामाजिक न्याय मंत्री यांच्या कन्येला तीन वर्षाकरीता शिष्यवृत्ती जाहिर करण्यात आली असून परदेश शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मंत्री व सचिवांच्या मुलांना देण्यात येत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार याप्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजकुमार बडोले : (१) हे खरे आहे.

(२) सन २०१७-१८ च्या परदेश शिष्यवृत्तीसाठी सामाजिक न्याय मंत्री व सचिव यांच्या पाल्यांनी विद्यार्थी म्हणून अर्ज केला हे खरे आहे. परंतु निवडप्रकियेमध्ये सामाजिक न्याय मंत्री व सचिव यांचा कुठलाही सहभाग नव्हता. मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गठित समितीने केलेल्या शिफारशीस मा.मुख्यमंत्री महोदयांनी मान्यता दिली. सामाजिक न्याय मंत्री व सचिव यांच्या पाल्यांची योजनेच्या नियमानुसार व गुणवत्तेवर निवड झाली. परंतु सामाजिक न्याय मंत्री यांच्या कन्येनी शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेला नाही.

(३) सन २०१७-१८ या वर्षाकरीता परदेश शिष्यवृत्ती योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांची निवड करण्याकरीता मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली निवड समितीचे गठन करण्यात येवून, या समितीने दिनांक २७ जून, २०१७ च्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार विहीत निकषांत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची नियमानुसार निवड केलेली आहे. या निवड प्रक्रियेत अनियमितता वा गैरप्रकार आढळून आलेला नसल्याने कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

आदिवासींची बनावट प्रमाणपत्रे सादर करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

(७४) * ३५१६७ श्रीमती विद्या चव्हाण : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बनावट प्रमाणपत्राद्वारे नोकरी मिळविलेल्या आदिवासी कर्मचारी व अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करुन त्यांच्या लाभाची वसुली करणे, रुपये २४४ कोटींचे खावटी कर्ज माफ करणे तसेच आदिवासी विकास संस्थांना १० टक्के पर्यंत कमिशन वाढविण्याबाबतचा निर्णय मा.आदिवासी विकास मंत्री यांनी आदिवासी विकास महामंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत घेतल्याचे दिनांक ३० सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयाचा तपशील काय आहे व त्याची अंमलबजावणी केंव्हा करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.विष्णु सवरा : (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

राज्यातील बनावट प्रमाणपत्राद्वारे नोकरी मिळविलेल्या आदिवासी कर्मचारी व अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करुन त्यांच्या लाभाची वसुली करणे, तसेच आदिवासी विकास संस्थाना १० टक्के पर्यंत कमिशन वाढविण्याबाबत आदिवासी विकास महामंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत संस्थांच्या प्रतिनिधींनी आपली मते मांडली परंतु त्याबाबत कोणताही निर्णय वा ठराव घेण्यात आलेला नाही.

आदिवासी विकास विभागाच्या सर्वसाधारण वार्षिक सभेतील आयत्या वेळचा ठराव क्रमांक २ अन्वये खावटी कर्जवाटपाची थकीत असलेली रुपये २४४ कोटी इतकी रक्कम माफ करणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यासंदर्भात ठराव पारीत करण्यात आला आहे. त्यानुषंगाने आदिवासी विकास महामंडळ, नाशिक यांच्यामार्फत कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत

(७५) * ३६५५२ श्री.तानाजी सावंत, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: विदर्भात अवकाळी पाऊसामुळे सोयाबीनचे दर पडण्याचा अंदाज असतांनासुध्दा शासनाने धोरणात्मक निर्णय न घेतल्याने सोयाबीनला असलेल्या रुपये ३०५० या हमीभावापेक्षा कमी दराने सोयाबीन व कापसाची खरेदी करीत असणे परिणामी शेतकऱ्यांना होत असलेले नुकसान, यासाठी बाजारभाव व हमीभाव यातील फरक शेतकऱ्यांना देणे, खाद्यतेलाच्या आयात शुल्कात वाढ करणे, सोयाबीन निर्यातीसाठी प्रोत्साहन अनुदान देणे अशा मागण्या शेतकऱ्यांनी व शेतकरी संघटनांनी दिनांक २८ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मध्य प्रदेश सरकारच्या धर्तीवर हमीभावातील फरकाची रक्कम थेट शेतकऱ्यांचे बँक खात्यात जमा करण्याची मागणी माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण करणे तसेच विदर्भात कापूस व सोयाबीन खरेदी केंद्र सुरु करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

सभापती, कृषि उत्पन्न बाजार समिती, लासलगांव यांचे दिनांक ०४/०९/२०१७ चे पत्र व डॉ.अनिल बोंडे, विधानसभा सदस्य, मोर्शी मतदार संघ यांचे दिनांक ०३/११/२०१७ च्या पत्रान्वये सोयाबीनसाठी भावांतर योजना लागू करण्याची मागणी करण्यात आली आहे.

(३) केंद्र शासनाने जाहिर केलेला हमीभाव व चालू बाजारभाव यामधील फरकाएवढी रक्कम शेतकऱ्यांना देण्यासाठीच्या भावांतर योजनेच्या प्रस्तावाची छाननी सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अमळनेर (जि.जळगाव) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतातील वीज पुरवठा खंडित केल्याबाबत

(७६) * ३६८३६ श्रीमती स्मिता वाघ : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमळनेर (जि.जळगाव) तालुक्यातील अनेक गांवातील शेतकऱ्यांना पूर्वसूचना न देता शेतातील वीज पुरवठा खंडित करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शेतकऱ्यांना वीज देयके वेळेत मिळाले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील कोराडी, चंद्रपूर व परळी येथील नवीन वीज संचांची कामे प्रलंबित असल्याबाबत

(७७) * ३६८६० श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्रीमती हुस्नबानू खलिफे : तारांकित प्रश्न क्रमांक ३२३०२ ला दिनांक ३ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महानिर्मिती कंपनीच्या कोराडी संच क्र. ८, ९, १० चंद्रपूर संच क्र. ८, ९ आणि परळी संच क्र. ८ या तीनही प्रकल्पाच्या कामाच्या कालावधीत ३ ते ४ वर्षांनी वाढ होवून परताव्याच्या रक्कमेत वाढ झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्प दिरंगाईची ३३ टक्के जादा रक्कम वीज ग्राहकांकडून वसूल करण्याचा निर्णय महानिर्मिती कंपनीने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रकल्प दिरंगाईची वाढीव रक्कम किती आहे, प्रकल्प विलंबाची कारणे काय आहेत तसेच याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार दोषी असलेल्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे खरे आहे.

(२) प्रकल्प पूर्णतेच्या नियोजित दिनांकापासून प्रकल्प प्रत्यक्ष पूर्ण होईपर्यंतच्या दिनांकापर्यंतची प्रकल्प दिरंगाईमुळे झालेली वाढ ही एकूण खर्चाच्या तुलनेत ९.०८ % इतकी आहे. राज्यातील वीज ग्राहकांचा वीज दर ठरवण्याचा अधिकार राज्य वीज नियामक आयोगास आहे. प्रकल्पांच्या वाढीव खर्चास राज्य वीज नियामक आयोगाकडून मंजुरी मिळण्यासाठी महानिर्मिती कंपनीने राज्य वीज नियामक आयोगाकडे याचिका दाखल केली असून त्याबाबतचा निर्णय प्रलंबित आहे.

(३) व (४) प्रकल्प दिरंगाईच्या वाढीव रक्कमेचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

कोराडी प्रकल्प संच क्र. ८, ९ व १०	: रुपये	७०४.२९ कोटी
चंद्रपूर प्रकल्प संच क्र. ८ व ९	: रुपये	१०७२.९२ कोटी
परळी प्रकल्प संच क्र.८	: रुपये	४८७.०८ कोटी
एकूण वाढ	: रुपये	२२६४.२९ कोटी

प्रकल्पांच्या विलंबाची सर्वसाधारण कारणे खालीलप्रमाणे आहे :-

१. प्रकल्प सुरु करण्यासाठी आवश्यक प्राथमिक साधनांची जुळवाजुळव करण्यास मुख्य संयंत्र (BTG) व उर्वरित संयंत्र (BOP)

२. कंत्राटदारांकडील अपुरे मणुष्यबळ तसेच कंत्राटदारांकडून संसाधन व्यवस्थापनाचा अभाव.

प्रकल्पनिहाय इतर कारणे पुढील प्रमाणे आहेत :-

(अ) कोराडी प्रकल्प विलंबाची कारणे :-

१. कंत्राटदारांकडून साधनसामुग्री पुरवठयासंदर्भात विलंब व सुसूत्रतेचा अभाव.

२. उर्वरित संयंत्र (BOP) कंत्राटदाराची खालवलेली आर्थिक स्थिती व त्यानुषंगाने कंत्राटदारावर आलेले आर्थिक निर्बंध.

(ब) चंद्रपूर प्रकल्प विलंबाची कारणे :-

१. सन २०१० मध्ये पाण्याच्या कमतरतेमुळे स्थापत्य बांधकामास झालेला विलंब.

२. सन २०१३ मध्ये अतिवृष्टीमुळे उर्वरित संयंत्र (BOP) व स्थापत्य कामात झालेला विलंब.

३. माहे ऑक्टोबर, २०१३ ते माहे जानेवारी, २०१४ पर्यंत वाळूच्या तूटवडयामुळे स्थापत्य कामास झालेला विलंब.

(क) परळी प्रकल्प विलंबाची कारणे :-

१. उर्वरित संयंत्र (BOP) कंत्राटदाराची खालावलेली आर्थिक स्थिती आणि त्यानुषंगाने कंत्राटदाराच्या उपकंत्राटदारांनी आर्थिक कारणांमुळे थांबवलेले काम.

२. सन २०१२ ते २०१५ च्या दुष्काळी परिस्थितीमुळे पाणी पुरवठयात झालेली कमतरता.

प्रकल्प दिरंगाई संदर्भात महानिर्मितीच्या कार्यवाही संदर्भात :-

महानिर्मितीकडून प्रकल्प दिरंगाई संदर्भात विश्लेषणासाठी त्रयस्थ संस्थांची नेमणूक करण्यात आली आहे. सदर संस्थांकडून विलंब विश्लेषणाचे काम प्रगतीपथावर आहे. विलंब विश्लेषणानंतर (Delay Analysis) निर्धारित नुकसान भरपाईची (Levy of LD) रक्कम सदर कंत्राटदारांकडून कराराच्या अटी व शर्तीनुसार वसूल करण्यात येईल.

नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीचे विभागीय बाजार समित्यांमध्ये रुपांतर करणेबाबत

(७८) * ३५२०७ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ३२०२० ला दिनांक १० ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहराचे कृषी उद्योग क्षेत्रातील वाढते महत्व व कृषी उत्पन्न बाजार समितीची व्यापक कार्यमर्यादा तसेच नाशिक तालुका भागातील अन्नधान्य, फळे, भाजीपाला इत्यादी विविध कृषी उत्पादनाचे वाढते प्रमाण यामुळे शेतमालास योग्य बाजारपेठ व विक्री मुल्य मिळून देण्याच्यादृष्टीने नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीचे विभागीय बाजार समित्यांमध्ये रुपांतर करणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात विशेषत: बीड जिल्ह्यात रेशीम उद्योग वाढीसाठी प्रोत्साहनपर योजना सुरु करण्याबाबत

(७९) * ३४९२२ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील : सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषतः बीड जिल्ह्यात मागील २० वर्षापासून रेशीम उद्योग मोठ्या प्रमाणात सुरु असूनही इतर राज्यांच्या तुलनेत राज्यात रेशीम कोषाचे शासकीय दर सरासरी ६० टक्के कमी असल्याने शेतकरी कोष विक्रीसाठी कर्नाटक राज्यामध्ये जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इतर राज्यात या शेतकऱ्यांची अडवणूक होत असल्याने रेशीम उद्योगास चालना मिळण्यासाठी प्रतीकिलो रेशीम कोषासाठी रुपये ५० अनुदान देणे, बाजारपेठ उपलब्ध करून देणे तसेच रेशीम उद्योग वाढीसाठी उपाययोजना करण्याची मागणी दिनांक २३ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास लोकप्रतिनिधींनी मा.कृषी मंत्री यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) अंशत: खरे आहे.

आतापर्यंत राज्यात खुली बाजारपेठ नसल्याने व कर्नाटक राज्यातील रामनगरम येथे पूर्वापार खुल्या बाजारपेठेत आकर्षक दर मिळत असल्यामुळे शेतकरी कोष विक्रीसाठी रामनगरम कर्नाटक येथील बाजारपेठेत जातात. रेशीम उत्पादक शेतकऱ्यांना खुल्या बाजारपेठेतील स्पर्धात्मक दर राज्यात मिळण्यासाठी जालना येथे कोषाची बाजारपेठ उभारणीची कार्यवाही सुरू आहे. तथापि, राज्यातील रेशीम उत्पादक शेतकऱ्यांची खाजगी व्यापाऱ्याकडून पिळवणूक होऊ नये म्हणून शासनाने रेशीम कोषास रुपये १०० ते १७० प्रती किलो किमान आधारभूत किंमत निश्चित केली आहे. त्याव्यतिरीक्त बायोव्होलटाईन या कोषास प्रति किलो ग्रॅम खरेदीमागे संबंधित दराच्या ५ टक्के प्रोत्साहनात्मक रक्कम देण्यात येते.

(२) नाही.

कार्यालयीन पत्रव्यवहार व अभिलेख तपासले असता असे निवेदन आढळून आले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

भोसरी (जि.पुणे) येथील मे.वुमन्स इंटरप्रिनर्स इंडस्ट्रीयल प्रिमायसेस को.ऑ.सोसायटी लि. कंपनीला नियमबाह्यरित्या परवानग्या देण्यात आल्याबाबत

(८०) * ३५३५४ श्री.धनंजय मुंडे : तारांकित प्रश्न क्रमांक २७२३३ ला दिनांक २१ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोसरी (जि.पुणे) येथील औद्योगिक क्षेत्रातील भुखंड क्र.टी-१८८ व एफ-II-५७/१, हे भूखंड मे.वुमन्स इंटरप्रिनर्स इंडस्ट्रीयल प्रिमायसेस को.ऑ.सोसायटी लि. यांना वितरीत करण्यात आले असून त्यांच्याकडून या भुखंडाबाबतच्या रूपये ७,१६,८७,०००/- इतक्या शिल्लक रक्कमेची वसुली न करताच त्यांना बांधकाम पुर्णत्वाचा दाखला व इतर परवानग्या देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान अनेकदा पत्रव्यवहार करूनही संस्थेवर वा या संस्थेला बेकायदेशीर लाभ मिळवुन देणाऱ्या महामंडळाच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर संस्था व महामंडळाचे अधिकारी/कर्मचारी यांनी परस्पर संगनमताने सुमारे तीन वर्षापेक्षा अधिक काळ महामंडळाच्या रकमा थकित ठेवून महामंडळाची फसवणुक केल्याचे निदर्शनास आल्याने सदर उद्योग घटकांकडुन त्यांना वाटप केलेला भुखंड परत घेणे व यांस जबाबदार असणाऱ्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देसाई : (१) होय, अंशत: खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

सदर संस्थेस समूह प्रकल्पासाठी केंद्र शासनाची मान्यता मिळाली नसल्यामुळे उर्वरित ५० टक्के अधिमूल्याची रक्कम वसूल करण्यात यावी व उर्वरित ५० टक्के अधिमूल्याची रक्कम वसूल होत नाही तो पर्यंत संस्थेस कोणतीही परवानगी देण्यात येवू नये असा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच

प्रादेशिक अधिकारी, पुणे यांनी दिनांक ४/५/२०१७ व दिनांक १६/६/२०१७ व दिनांक ६/९/२०१७ च्या पत्रान्वये सदर संस्थेला कमी भरलेली रक्कम रुपये ७,१६,८७०००/- भरण्याबाबत कळविलेले आहे.

सदर प्रकरणी दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून त्यांची विभागीय चौकशी बाबतची कार्यवाही महामंडळस्तरावर सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे बाजार समितीमध्ये सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

(८१) * ३५२६४ श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील मार्केट यार्डातील फळे/भाजीपाला विभागात स्वच्छता होत नसल्याने घाणीचे प्रमाण वाढून शहरात रोगराई वाढत असल्याचे तसेच बाजार समितीमध्ये मुलभूत सोयी सुविधा नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार स्वच्छता न राखणाऱ्या ठेकेदारांविरोधात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) (२) पुणे कृषि उत्पन्न बाजार समितीमधील कचऱ्याचे ढीग वाहून नेण्याचा ठेका दिलेल्या ठेकेदाराने दिनांक १४/०९/२०१७ ते १७/०९/२०१७ या कालावधीत कचरा उचलून न घेतल्याने कचऱ्याचे ढीग आढळून आले होते. त्या अनुषंगाने ठेकेदारास बाजार समितीने प्रती दिन रुपये २०००/- दंड आकारला होता. सदर कालावधीत बाजार समितीने पर्यायी व्यवस्था निर्माण करुन संपूर्ण बाजार आवारातील साफसफाई तात्काळ करण्यात आली होती.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील साखर कारखान्यांकडून प्रतिटन रुपये ५० इतका विकास निधी वसूल करीत असल्याबाबत

(८२) * ३४९७६ ॲड.जयदेव गायकवाड : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने विकास निधीच्या नावाखाली राज्यातील साखर कारखान्यांकडून प्रतिटन रुपये ५० वसूल करण्याचा निर्णय माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शेतकऱ्यांनी तसेच साखर कारखान्यांनी तीव्र विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) होय.

सन २०१६-१७ मधील ऊस गाळपाचा आढावा आणि सन २०१७-१८ मधील ऊस गाळप हंगामाचे धोरण ठरविण्यासाठी मा.मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली मा.मंत्री समितीची दिनांक २०/९/२०१७ रोजी झालेल्या बैठकीतील इतिवृत्तामधील विषय क्र. ४ मध्ये "ऊस बिलातील कपाती व ठेवीबाबतचा" या मुद्याचे अनुषंगाने, "शासन निर्णयास अधिन राहून भाग विकास निधी ऊस दराच्या कमाल ३% किंवा रुपये ५० यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढ्या मर्यादेपर्यंत कपाती" चा मा.मंत्री समितीमध्ये निर्णय झालेला आहे.

(२) नाही.

मा.मंत्री समितीच्या वरीलप्रमाणे निर्णयाबाबत शेतकऱ्यांनी तसेच साखर कारखान्यांनी तीव्र विरोध केला असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३) प्रश्न उदभवत नाही.

(४) प्रश्न उदभवत नाही.

राज्यातील उद्योगांना वीज दरात सुट देणेबाबत

(८३) * ३४९५६ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उद्योगांसाठी विजेचे दर हे शेजारील राज्यांच्या तुलनेत अधिक असल्याने राज्यातील अनेक उद्योग स्थलांतर करीत असल्याने मेक इन इंडियाच्या पार्श्वभुमिवर उद्योगांसाठी रुपये ७०० कोटींची तरतूद करुन वीज दरात सुट देण्याची मागणी उद्योजकांकडून होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी राज्यात उद्योग वाढीच्यादृष्टीने उद्योगांना वीज दरात सुट देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) वीज दरात सवलत देण्याची मागणी उद्योजकांकडून करण्यात येत आहे.

(२) राज्यातील विविध वर्गवारीतील ग्राहकांचे वीज दर महाराष्ट्र विद्युत आयोगाकडून निश्चित केले जातात. परंतु वीज दरात सवलत द्यावयाची झाल्यास विद्युत अधिनियम, २००३ मधील कलम ६५ नुसार त्याची प्रतिपूर्ती महावितरण कंपनीस अग्रिम अनुदान देऊन करावी लागते. औद्योगिक मागासलेपणा व विषमता विचारात घेऊन विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, डी व डी+ क्षेत्रातील औद्योगिक ग्राहकांना वीज वापराच्या कार्यक्षमतेवर आधारित व इंधन समायोजन आकारात तसेच नवीन उद्योगांना वीज दरात अतिरिक्त सवलत दिनांक २९/६/२०१६ च्या शासन निर्णयान्वये देण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

जव्हार (जि.पालघर) आदिवासी आश्रमशाळांतील आहार व फळांचा पुरवठा बंद करण्यात आल्याबाबत

(८४) * ३५३२१ श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग : तारांकित प्रश्न क्रमांक ३४३३१ ला दिनांक ३ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत चालविण्यात

येणाऱ्या आश्रमशाळांतील एकूण १७ हजार ५५६ विद्यार्थ्यांना दररोज सकाळी दिला जाणारा केळी, सफरचंद, मोसंबी आणि अंडी हा सकस आहार माहे सप्टेंबर, २०१७ पासून बंद करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार सदर सकस आहार बंद करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त आश्रमशाळेतील निवासी विद्यार्थ्यांना नियमित सकस आहार मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.विष्णु सवरा : (१) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय, दिनांक १५/०६/२०१७ नुसार ऋतुमानानुसार फळांऐवजी शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना २५० मि.लि. दूध पुरवठा करावयाचा असल्याने प्रकल्प अधिकारी, जव्हार (जि.पालघर) यांचेकडून आश्रमशाळांमध्ये दुध पुरवठयाबाबत ई-निविदा प्रक्रियेची कार्यवाही सुरु आहे. दरम्यानच्या कालावधीमध्ये विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून विद्यार्थ्यांना फळांऐवजी अंडी व केळी, मुग, वाटाणा, मटकी इत्यादी उसळींचा पौष्टीक आहार देण्यात येत आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

बुरुडपाडा (ता.वसई, जि.पालघर) येथील नाल्यावर पुल बांधण्याबाबत

(८५) * ३५६८१ श्री.रविंद्र फाटक : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुरुडपाडा (ता.वसई, जि.पालघर) येथील नाल्यावर पुल नसल्याने शाळेत जाण्याकरिता शालेय विद्यार्थ्यांना पोहून पलीकडे जावे लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांच्या जिवितास धोका निर्माण होत असल्याने सदर ठिकाणी पुल बांधण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.विष्णु सवरा : (१) होय.

दिनांक १४ ऑक्टोंबर, २०१७ रोजीच्या वृत्तपत्रात या आशयाची बातमी प्रसिध्द झालेली आहे.

(२) बुरुडपाडा पुलाच्या कामास माहे मार्च, २०१७ मध्ये आदिवासी उपयोजनेंतर्गत मंजूरी प्राप्त असून सदर काम निविदा स्तरावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

निमगांव (जि.भंडारा) येथील भारनियमनामुळे नागरीकांची गैरसोय होत असल्याबाबत

(८६) * ३५९०९ श्री.परिणय फुके : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निमगांव (जि.भंडारा) फिडरवर पहेला येथील विद्यृत उपकेंद्रातून १४ तासाचे भारनियमन होत असल्यामुळे स्थानिक शेतकरी, नागरीक व विद्यार्थ्यांची गैरसोय होत असल्याने याबाबतची तक्रार नागरीकांनी संबंधित वीज वितरण अधिकारी यांचेकडे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) होय, हे खरे आहे.

(२) ११ के.व्ही. निमगाव फिडरला ३३/११ के.व्ही. पहेला उपकेंद्रातून वीज पुरवठा होतो. सप्टेंबर व ऑक्टोबर, २०१७ च्या पहिल्या आठवडयामध्ये राज्यात विद्युत पुरवठयाची उपलब्धता मागणीच्या प्रमाणापेक्षा खूपच कमी झाल्याने वरील वाहिनीवर आपातकालीन स्थितीत माहे सप्टेंबर व ३ ऑक्टोबर ते ७ ऑक्टोबर दरम्यान किमान ३.२० तास ते कमाल १३ तास इतके भारनियमन मा.वीज नियामक आयोगाच्या निकषानुसार करावे लागले होते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मौजा आजंती (ता.नेर, जि.यवतमाळ) येथील अनियमित भारनियमनाबाबत

(८७) * ३५०३३ श्री.हरिसिंग राठोड : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा आजंती (ता.नेर, जि.यवतमाळ) तसेच इतर तालुक्यांमध्ये अनियमितपणे भारनियमन होत असल्याने येथील नागरीकांनी महावितरणाच्या विरोधात वीज वितरण कंपनीच्या कार्यालयाला भेट देवून रोष व्यक्त केला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यात वेळापत्रकानुसारच भारनियमन करणे तसेच ग्रामीण भागात वारंवार खंडित होणारा विद्युत प्रवाह सुरळीत होण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (१) हे खरे आहे.

(२) राज्यातील औष्णिक विद्युत केंद्रांना होणारा कोळशाचा पुरवठा कमी झाल्याने त्याचा विपरित परिणाम वीज निर्मिती व पर्यायाने वीज पुरवठयावर झाला होता. दिनांक ०३/१०/२०१७ ते ०७/१०/२०१७ पर्यंत गरज भासेल तेव्हा काही कालावधीकरिता मा.वीज नियामक आयोगाच्या निकषानुसार व वीज प्रणालीच्या सुरक्षिततेसाठी यवतमाळ जिल्हयामध्ये वितरण व वाणिज्य हानी गटाप्रमाणे वाहिन्यांवर भारनियमन करण्यात आले.

तसेच ग्रामीण भागात खंडीत होणारा विद्युत प्रवाह सुरळीत करण्याकरीता ११ केव्ही वाहिनीची देखभाल व दुरुस्ती करण्यात आली. त्यामुळे ११ केव्ही वाहिनीवर होणारा ट्रिपींग कमी होवून विद्युत पुरवठा सुरळीत सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

कस्तुरबा कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज बल्लाशा (जि.चंद्रपूर) महाविद्यालयातील गैरव्यवहाराबाबत

(८८) * ३६७८७ श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.आनंदराव पाटील, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कस्तुरबा कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज बल्लाशा, (जि.चंद्रपूर) या संस्थेच्या महाविदयालयास शासनाची व विदयापीठाची मान्यता प्राप्त नसतांना तसेच कोणत्याही मुळ परवानगी पत्राची पडताळणी न करता संस्थाचालक व समाजकल्याण अधिकारी/कर्मचारी यांनी सन २००७-२००८ व सन २००८-२००९ या कालावधीतील समाजकल्याण विभाग, चंद्रपूर यांच्याकडून मागासवर्गीय विदयार्थ्यांची शिष्यवृत्ती व शिष्यवृत्तीची आगाऊ रक्कम घेऊन गैरव्यवहार केल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींवर फौजदारी गुन्हा दाखल करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजकुमार बडोले : (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला, वाशिम व बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याबाबत

(८९) * ३५७१८ श्री.गोपिकिशन बाजोरीया : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम विदर्भातील अकोला, वाशिम व बुलढाणा जिल्हयातील केवळ ३०२ शेतकऱ्यांनाच दिवाळीपूर्वी कर्जमाफी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अकोला, वाशिम व बुलढाणा जिल्हयातील प्रत्येकी किती शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यात आली व किती शेतकऱ्यांना अद्यापी कर्जमाफी देणे बाकी आहे,

(३) असल्यास, कर्जमाफीची प्रकिया कधीपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

श्री.सुभाष देशमुख : (१) हे खरे नाही.

(२) दिवाळीनंतर अकोला जिल्हयाकरीता ७८ सभासदांपैकी ६५ सभासदांना / शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यात आली आहे. दिनांक ४/१२/२०१७ अखेर अकोला व वाशिम जिल्हयातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शेतकऱ्यांच्या एकूण ५५,२९९ खात्यांमध्ये रुपये २३९ कोटी २६ लाख कर्जमाफीची रक्कम जमा करण्यात आली आहे.

बुलढाणा जिल्हयामध्ये राष्ट्रीयकृत, व्यापारी व ग्रामीण बँकांच्या शेतकऱ्यांच्या ७८७३ एवढ्या खात्यांमध्ये रुपये ४८५७.३४ लाख तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शेतकऱ्यांच्या २०२३३ खात्यांमध्ये रुपये ९७६९.२९ लाख एवढी कर्जमाफीची रक्कम जमा करण्यात आली आहे. उर्वरीत शेतकऱ्यांना त्यांच्या कर्ज खात्यांमध्ये कर्जमाफी देण्याबाबतची प्रक्रिया सुरू आहे.

(३) सर्व पात्र लाभार्थींना कर्जमाफीचा लाभ लवकरात लवकर देण्याचे प्रयत्न युध्दपातळीवर सुरू आहेत.

इंचलकरंजी (जि.कोल्हापुर) येथील साधना सहकारी बॅक मर्यादित बँकेच्या संचालकानी केलेल्या गैरव्यवहाराबाबत

(९०) * ३६७४० श्रीमती विद्या चव्हाण : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंचलकरंजी (ता. हातकंगले, जि.कोल्हापुर) येथील साधना सहकारी बँक मर्यादित बँकेच्या संचालकांनी आर्थिक गैरव्यवहार केला असल्याने सदर बँक बंद असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी संचालकांवर कारवाई करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा.सहकार मंत्री यांना दिनांक २१ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुभाष देशमुख : (१) होय, अंशत: खरे आहे.

साधना सहकारी बँक लि. इचलकरंजी या बँकेचा परवाना रिझर्व्ह बँकेने त्यांच्या दिनांक २०/१/२००९ रोजीच्या पत्रान्वये रद्द केलेला असून त्यास अनुसरुन सहकार आयुक्तांच्या दिनांक २७/१/२००९ रोजीच्या आदेशान्वये सदर बँक अवसायनात घेण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत अवसायनाची कार्यवाही सुरु आहे.

(२) सदर विषयाबाबतचे निवेदन सहकार आयुक्त कार्यालयास अथवा शासन स्तरावर प्राप्त झालेले नाही.

(३) बँकेच्या सन २००८-०९ मधील लेखापरिक्षण अहवालामध्ये नमूद आक्षेपार्ह मुद्दे व बँकेच्या कामकाजातील अनियमिततेमुळे सहकार आयुक्तांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८८ अन्वये चौकशी करण्यासाठी दिनांक २४/११/२०१० रोजीच्या आदेशान्वये प्राधिकृत चौकशी अधिकाऱ्यांची नियुक्ती केली. संबंधित अधिकाऱ्यांनी बँकेच्या एकूण ११ संचालकांवर एकूण रुपये २.९९ कोटी इतक्या रक्कमेची जबाबदारी निश्चित केली आहे.

सहकार आयुक्तांच्या सदर आदेशाविरुध्द संबंधित संचालकांनी तत्कालीन मा.मंत्री (सहकार) यांचेकडे दाखल केलेल्या पुनरिक्षण अर्जाच्या अनुषंगाने मा.मंत्री महोदयांनी त्यांच्या दिनांक १२/०३/२०१३ रोजीच्या आदेशान्वये कलम ८८ च्या आदेशास स्थगिती दिली.

तद्नंतर मा.मंत्री सहकार यांनी त्यांच्या दिनांक १७/०३/२०१७ रोजीच्या आदेशान्वये कलम ८८ च्या आदेशावरील स्थगिती उठविली. सदर आदेशास अनुसरुन संबंधित संचालकांकडून रक्कमेची वसूली करण्यासाठी दिनांक ३०/०५/२०१७ रोजी वसूली आदेश निर्गमित करण्यात आले.

सदर संचालकांनी मा.मंत्री महोदयांच्या दिनांक १७/०३/२०१७ रोजीच्या आदेशाविरुध्द मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. ६६६८/२०१७ दाखल केली असून मा.उच्च न्यायालयाने त्यांच्या दिनांक ०६/०९/२०१७ रोजीच्या आदेशान्वये मा.मंत्री (सहकार) यांच्या दिनांक १७/०३/२०१७ रोजीच्या आदेशास स्थगिती दिली आहे. सद्यस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन : **डॉ. अनंत कळसे**

नागपूर. **प्रधान सचिव,**

महाराष्ट्र विधानपरिषद

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मुद्रणालय, नागपूर.